१४२०

म. ग्रं. सं. ठाणें

विषय निबंध

सं. क्र. ९०

REFBK-0001749

म. ग्रं. सं. ठाणें
निबंध
९०

तोबाला तर मानापमानाची
... (पृ. ...)

... प्र. ग्रं. सं. ...

# संगीत मानापमान टीका.

किंमत सहा आणे.

या नाटकांतील गुणदोषांसंबंधानें थोडक्यांत असें ह्मणतां येईल कीं तें सर्वांगांनीं दोषपरिपूर्ण आहे हाच एक त्यांतील गुण असून, त्यांतील मुख्य दोष रा. खाडिलकरांसारख्या कसलेल्या लेखकाच्या र्णांतून निर्माण झालें आहे हा होय! (पृष्ठ ७.)

REFBK-0001749

# संगीत मानापमान

## टीका.

लेखक }
मुद्रक. } वामन रामचंद्र कानविंदे.
प्रकाशक. } सिटी प्रिंटिंग प्रेस, करोलकरगल्ली,
बेळगांव.

ता. १२ मे १९२० इसवी.

[ आवृत्ति पहिली. ] [ किंमत सहा आणे

या पुस्तकासंबंधी सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

प्रस्तुत टीका ही १९१२ साली अवाचित लिहिण्यांत आली. पुढें दोन वर्षांपूर्वी जशीची तशीच ती छापण्यास सुरवात झाली. परंतु प्रतींतील कांहीं पानें गहाळ झाल्याचें आढळून आल्यामुळें तीं छापण्याचें काम जें एकदां मागें पडलें तें आज पुरें होत आहे.

रा. खाडिलकर यांची नाटककार या नात्यानें योग्यता खरो-खरीच मोठी आहे. त्यांचीं कांहीं गद्य नाटकें निस्संशय मोठ्या बहारीचीं वठलीं आहेत. त्या नाटकांत दिसून येणाऱ्या त्यांच्या रचनाचातुर्य, भाषाप्रभुत्व, विचारगांभीर्य, इत्यादि गुणांबद्दल त्यांचें कौतुक करण्यांत आह्मी कोणालाही हार जाणार नाहीं. पुनः कदाचित् योग जुळून येईल, तर रा. खाडिलकरांच्या दुसऱ्या एखाद्या नाट्यकृतीवर प्रस्तुत टीकेहून अगदीं भिन्न अशी प्रशंसापर चिकित्साही वाचकांच्या हातीं आह्मी खचित देऊं शकूं.

संगीत मानापमान आमच्या पाहण्यांत येण्यापूर्वीच त्याचा पुष्कळ लौकिक झालेला होता. त्यामुळें त्या नाटकाचा प्रयोग पाहण्यास आह्मी मोठ्या उल्हासानें गेलों. परंतु प्रयोगाच्या प्रारंभापासुन समाप्तिपर्यंत आमचा हिरमोड अधिकाधिकच होत गेला. परीक्षेंत पहिला नंबर येईल अशी सर्वांची उमेद असलेला मुलगा सगळ्याच विषयांत सपशेल नापास झाला असतां त्याच्या इष्टमित्रांच्या मनाची जी अवस्था होईल, तीच आमच्याही मनाची झाली.

गेल्या तीस चाळीस वर्षांत मराठी नाट्यकलेस क्रमशः

अनेक स्थित्यंतरें झालीं आहेत. या स्थित्यंतरांची नाट्यकलेची प्रगति करण्याकडेच एकंदरींत प्रवृत्ति आहे, हेंही कांहीं खोटें नव्हे. परंतु नवीन टूम प्रचारांत आणून चार पैसे मिळविण्यापलीकडे नाटकलेखक व नाटक मंडळ्या यांची फारशी उत्कंठा दिसून येत नाहीं. एकदां कोणी एकानें नवी टूम काढिली आणि ती जरा यशस्वी झाली कीं कांहीं वर्षे इतर लेखकांना, नटांना व प्रेक्षकांना त्या टुमीपलीकडे पाहण्याची विशेष आवश्यकताच वाटत नाहीं. ही या सर्वांमधील गोम दूर करण्याचा यत्न करणें जर इष्ट असेल, तर रा. खाडिलकरांच्या लोकप्रिय ' मानापमाना ' च्या अंतःस्वरूपाचें आविष्करण विशेष ठळकपणानें केल्याबद्दल रा. खाडिलकर तर नाहींतच, पण नाटकमंडळ्या व वाचकगणही आह्मांवर रागावणार नाहींत, अशी आह्मांस आशा आहे.

संगीत मानापमान नाटक ज्या अर्थी रा. खाडिलकर यांनीं लिहिलेलें आहे, किंवा ( बालगंधर्वादि नटांच्या गायनपटुत्वामुळें कां असेना, पण ) ज्या अर्थी तें लोकप्रिय झालेलें आहे, त्या अर्थी तें प्रशंसनीयच असलें पाहिजे, असा ज्यांचा कोटिक्रम असेल, त्यांच्याशीं आमचें कांहीं बोलणें नाहीं. परंतु प्रस्तुत टीकेंतील कोणतीही विधानें निराधार किंवा चुकीचीं असल्याचें जर आह्मांस कोणी निस्पृहपणानें दाखवून देतील, तर आह्मी त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानूं, इतकें सांगून आह्मी वाचकांच्या हवालीं हें पुस्तक करतों.

बेळगांव
मिलो प्रिंटिंग प्रेस.
१२ मे १९२०

पुस्तककर्ता.

# संगीत मानापमान

हें नाटक प्रसिद्ध गद्यनाटककर्ते रा० रा० कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनीं रचिलेलें आहे. रा० रा० शंकर नरहर जोशी यांनीं तें ' चित्रशाळा ' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें आहे. पुस्तकाचें बाह्य स्वरूप बरेंच रमणीय आहे. पुस्तकांत प्रयोगाच्या वेळचे निरनिराळ्या प्रसंगांचें मजेशीर फोटोही आठ दहा आहेत. या नाटकांतील पदांची स्वरमालाही " पदांचा उपयोग इतर कोणास करतां येऊं नये ह्मणून " त्या त्या पदाच्या खालीं दिलेली आहे. या नाटकाचे प्रयोग सुप्रसिद्ध ' किर्लोस्कर संगीत नाटक मंडळी ' करीत असते. या मंडळीच्या या नाटकाच्या प्रयोगास ठिकठिकाणीं मिळ-णाऱ्या लोकाश्रयावरून पहातां, ' संगीत मानापमान ' इतस्ततः लोकप्रिय झालेलें आहे याबद्दल अर्थातच संशय नाहीं. अशा या नाटकाचा प्रयोग मोठ्या उत्सुकतेनें पहावयास गेलों असतां, आह्मी थिएटर चुकलों, कीं मंडळी चुकलों, कीं चुकून भलत्याच नाटकास आलों अशी आमची अवस्था झाली ! ' किर्लोस्कर मंडळीं ' त अलीकडे * दैववशात् उणेपणा आलेला असल्यामुळें

---

* चार पांच वर्षांपूर्वीच प्रस्तुत टीका लिहिण्यांत आलेली होती, ती जशीचीतशीच प्रसिद्ध केली जात आहे.

हल्लींच्या चालचलाऊ पात्रांनींच आपल्या बुद्धिचातुर्यानें प्रयोगाचा बेरंग केला असेल अशी मनाची समजूत करून पाहिली. तथापि मूळ पुस्तक वाचून पाहिल्या शिवाय मनाला बरें वाटेना. ह्मणून आशायुक्त मनानें व सावधान चित्तानें 'संगीत मानापमान नाटका'चें पुस्तक समग्र वाचून पाहिलें. परंतु दुर्दैवाची गोष्ट! प्रयोग पाहिलेला पत्करला, पण हें पुस्तक वाचणें नको असें होऊन गेलें! नाटककर्ता या नात्यानें रा० खाडिलकरांचा एवढा लौकिक ऐकूं येत असतां, प्रस्तुत नाटक त्यांचीच कृति आहे हें पाहून कोणालाही अचंबाच वाटेल. या नाटकांतील संविधानकांत चातुर्य तर नाहींच नाहीं, पण नुसती मनोवेधक काहणी देखील नाहीं.

बाबासाहेब नामक एका सरदाराला दोघी मुली होत्या. वडील मुलगी अक्कासाहेब ही विलासधर नांवाच्या एका श्रीमंतास दिलेली होती. धाकटी मुलगी भामिनी ही धैर्यधर नामक पुरुषाला देऊं केलेली होती. या उभयतांनींही एकमेकांस मुळींच पाहिलेलें नव्हतें. तरी देखील बाबासाहेबांच्या विनंतीवरून धैर्यधर तिच्याशीं विवाह लावण्याच्या उद्देशानें मिरवत नगरांत येतो! भावी पतिपत्नींची प्रथम दृष्टादृष्ट महिषासूरमर्दिनीच्या देवालयांत व्हावी व त्यासाठीं देवीचा प्रसाद ह्मणून फुलांची माळ भामिनीनें धैर्यधर सेनापतीच्या हातांत टाकावी असें बाबासाहेबांनीं ठरविलेलें होतें. पण धैर्यधर कितीही शूर वीर असला

तरी तो लक्षाधीश नसल्यामुळें त्याच्याशीं लग्न लावण्यास भामिनी कबूल नव्हती. बाबासाहेब रागावोत किंवा बाबासाहेबांचे काकासाहेब स्वर्गांतून खालीं येवोत, लग्न लावीन तर मोठ्या, थोरल्या लक्षाधीशाबरोबरच लावीन, असा भामिनीचा प्रचंड निश्चय होता. या निश्चयास अनुसरून,—देवीच्या समोर धैर्यधर प्रसादाची वाट पहात उभा असतां—दाराआड राहिलेल्या भामिनीस बाबासाहेबांनीं जेव्हां मोठ्या ममतेनें "भामिनी इतकें कांहीं लाजावयाला नको; ये अशी बाहेर," असें ह्मटलें, तेव्हां त्या लाजाळू मुलीनें मंजुळ सुरांत असा जबाब दिला कीं "नाहीं, मी साफ येणार नाहीं. पुनः सांगते मी साफ येणार नाहीं." !!! हें उत्तर ऐकून धैर्यधर "मला राग आला नाहीं व यांत मी अपमानही समजत नाहीं; पण मला तुमच्या मुलीशीं लग्नच कर्तव्य नाहीं असें ह्मणून आल्यापावलीं परत निघून गेला. येथें पहिला अंक संपतो.

पुढें बापलेकींचें काय काय बोलणें झालें व भामिनीला बाबासाहेबांनीं कसें वळविलें देव जाणे. पण गरिबाशीं लग्न लावायाचें नाहीं असा तिचा दृढ निश्चय असतां बाबासाहेबांच्या सांगण्यावरून ती धैर्यधराच्या छावणीशेजारीं आपल्या एका मैत्रिणीच्या बागेंत आपलें फक्त नांव पालटून रहावयास गेली आहे, व धैर्यधराच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकून तिचें मन त्याच्याकडे झुकूं लागलें आहे, अशी अद्भुत व शोचनीय बातमी

एक दोघां फालतू पात्रांकडून प्रेक्षकांच्या कानांवर अवचित् आपटण्यांत आली आहे. तिच्याशीं लग्न करण्याचा लक्ष्मीधर नामक एका लक्ष्मीपुत्राचा हेतु होता. तथापि तिच्या प्राप्तीसाठीं त्याला तळमळ लागून राहिली होती असें मात्र दिसत नाहीं. लक्ष्मीधराशीं भामिनीचें लग्न व्हावें, निदान धैर्यधराशीं तरी तें होऊं नये, असें तिच्या बहिणीचा नवरा विलासधर याचें मत होतें. धैर्यधराच्या पराक्रमाला भामिनी मोहूं लागली ह्मणून विलासधरानें लक्ष्मीधराला पराक्रमी बनविण्याची एक नामी युक्ति काढिली. ती अशी कीं विलासधरानें रात्रीं वेष पालटून भामिनीला लुटण्यास जावें व ती ओरडली ह्मणजे लक्ष्मीधरानें तरवार घेऊन धांवत यावें. तसें त्यानें केलें ह्मणजे विलासधरानें पळून जावें! अशा फॅशनचा लक्ष्मीधराचा पराक्रम पाहिला ह्मणजे भामिनी धैर्यधराचा नाद सोडून तात्काळ लक्ष्मीधराच्या गळ्यांत माळ घालील अशी त्या खुळ्या विलासधराची अजब कल्पना होती! ठरल्याप्रमाणें रात्रीं विलासधर बागेंत शिरतो. त्यानें बरोबर घरफोडीचीं हत्यारें पात्यारें कांहीं आणिलेलीं नव्हतीं किंवा नुसती तलवार देखील त्याच्याकडे नव्हती. कारण त्याच्या सोयीसाठीं तेवढ्या अपरात्रीं भामिनी ऊर्फ वनमाला घराबाहेर येऊन घर राखीत उभी राहणार असें रा. खाडिलकरांनीं त्याला आधींच सांगून ठेविलेलें असावें! ती घर राखीत होती त्या अर्थीं तिच्या हातीं शस्त्र होतें ह्मणाल तर नाहीं,

तें तिजकडे मुळींच नव्हतें ! त्या घरांत तर " फुटकी कवडी " देखील नव्हती असें खुद्द भामिनीच सांगते ! तिच्या आंगावर दागिने असण्याचा तर संभवच नाहीं. कारण बोलून चालून ती वनांत राहणारी वनमाला बनलेली होती. तथापि विलासधर तिच्या आंगावर धांवून येऊन तिचे दागिने मागूं लागला ! तिनें घरांत पळून जाण्याचा यत्न केला नाहीं. इतक्यांत त्या ठिकाणीं खरेच चोर आले. त्यांस पाहून लक्ष्मीधरानें घाबरून आपली तलवार फेंकून दिली व ती भामिनीनें उचलून घेतली. विलासधर व लक्ष्मीधर यांना पळून जावेंसें न वाटल्यामुळें चोरांनीं त्यांना झाडांशीं बांधून घातलें व त्यांच्या आंगावरील सर्व दागिने काढून घेतले. पुढें ओरडाओरड ऐकून त्या ठिकाणीं धैर्यधर व शीलधर हे दोघे आले. भामिनीसहवर्तमान सर्व जण चोरांबरोबर लढले व चोरांचा पराभव होऊन त्यांच्या मुसक्या बांधण्यांत आल्या. हा प्रसंग घडण्याचे पूर्वीं ह्याच रात्रीं धैर्यधर बागेंत येऊन गेलेला होता व त्याची वनमालेशीं गांठ पडून उभयतांमध्यें संभाषण झालेलें होतें. पहिल्याच भेटीला चंद्राच्या अंधुक प्रकाशांत धैर्यधराचें मन तिजवर गेलें होतें. पूर्वोक्त प्रसंग घडल्यानंतर तर धैर्यधर अधिकच उत्सुक झाला. भामिनीनेंही त्याच्या रूपाची निर्भीडपणानें तारीफ केली आहे, त्या अर्थीं तीही त्यास पूर्णपणें मोहित झाली होती हें उघड आहे. अर्थात् त्यांचा तेथच्या तेथें विवाह लावण्यांत आला असता

तर गोष्ट तुटक न होतां नाटक येथेंच समाप्त झालें असतें. परंतु दोनच अंकांत नाटक संपविणें योग्य न घाटल्यामुळें नाटककर्त्यानें आणखी तीन अंक तें कसेंबसें ओढीत नेलें आहे. या ओढाओढीमुळें पहिल्या दोन अंकांतील दोष ताणले गेले असून, शिवाय त्यांस फांटेही भरपूर फुटले आहेत. त्यांचे दिग्दर्शन करण्या पूर्वी पुढील तीन अंकांतील कथानक तरी काय आहे तें सांगून मोकळें झालें पाहिजे.

तिसऱ्या अंकांत वनांतील वनमाला पुनरपि नगरांतील भामिनी झालेली वाचकांच्या व प्रेक्षकांच्या दृष्टीस पडते. धैर्यधर श्रीमंत झाला आहे. त्याच्या पराक्रमाबद्दल राजानें त्याला पंचवीस लाखांची जहागीर व तीन चांदांची सरदारकी दिली आहे. बाबासाहेबांस भेटण्यासाठीं—पूर्वीप्रमाणें लग्नासाठीं नव्हे-धैर्यधर पुनः नगरींत येत आहे व देवीच्या दर्शनाच्या वेळीं देवीच्या गळ्यांतील हार प्रसाद म्हणून त्याच्या हातीं टाकण्याकरितां भामिनी आपलें शरीर वस्त्रालंकारांनीं मढवून घेत बसली आहे. धैर्यधराला वरण्याला भामिनी अगदीं तप्त व तत्पर झाली आहे. परंतु बाबासाहेबांनीं " पूर्वीचें सगळें विसरून भामिनीला पदरांत घेऊन पवित्र करा " अशी धैर्यधराला विनंति केली असतां त्यानें ती नाकारली व " करीन लग्न तर एखाद्या गरीबाच्याच मुलीशीं करीन " असा आपला खंबीर निश्चय असल्याचें त्यानें जाहीर केलें. भामिनीच्या आशेचा या प्रमाणें भंग झाल्यावर

ती ' गरीबाची मुलगी ' होण्याचा ऊर्फ तशी बतावणी करण्याचा निश्चय करते.

वनमाला हें नांव पुनश्च धारण करून दासीच्या नात्यानें भामिनीनें धैर्यधराला आपल्या हातांतील नुसतें बाहुलें बनविलें आहे असा चमत्कार चौथ्या अंकांत एकाएकीं दृष्टीस पडतो ! भामिनी इतकी शिरजोर झालेली होती, कीं तिनें बिनदिक्कत धैर्यधराच्या नोकर-चाकरांना आपल्याच अधिकारांत रजा देऊन रवाना केलें ! धैर्यधर किती मेषपात्र बनला आहे याची खात्री असल्यामुळें रजेवर जाणाऱ्या अधिकाऱ्यांनीं जातांना त्याला रामराम करून जाण्याचीही तसदी घेतली नाहीं. त्या धैर्यधर नामक ह्मसोबाला तर मानापमानाची कांहीं चाडच नव्हती. त्यानें तिजवर रागावण्याचा बेत केला होता. पण वनमाला डोळ्यापुढें दिसली न दिसली तोंच त्याचा बेत ढांसळला व तो ह्मणाला " क्रोध ह्मणजे कोणच्या गांवचा पदार्थ असतो, याचीही मला आतां आठवण राहिली नाहीं !!! "

शेवटचा अंक अतिशयच बुरसा आहे. या अंकांत कांहीं पात्रें येऊन धैर्यधराला अशी बतावणी करून सांगतात, कीं बाबासाहेबांनीं भामिनीची फार निर्भर्त्सना केली. तेव्हां तिनें रागावून आपल्या आंगावरील दागिने काढून टाकले. बाबासाहेबांनीं ते वनमालेसाठीं पाठविले आहेत व भामिनीनेंही हे दागिनें वनमालेनें आंगावर घातलेच पाहिजेत असें आग्रहपूर्वक सांगितलें आहे,

स्त्रीशींच लग्न लावण्याचा पण करणारा धैर्य-
भामिनीनें त्याचा अत्यंत निंद्य रीतीनें अपमान
होता त्याच भामिनीनें पाठविलेले दागिने वनमा-
लेला आंगवर घालण्यास सांगतो, इतकेंच नव्हे तर हे
दागिने मी माझ्या हातांनीं तुझ्या आंगावर घालतों, मग
तर झालें ? " असें बेलाशक ह्मणतो, तेव्हां त्याच्या
नकटेपणाची ही कमालच झाली नाहीं काय ? " भामि-
नीच्या दागिन्यांचा माझ्या आंगाला विटाळही नको "
असे शब्द वनमालेच्या तोंडीं घालून धैर्यधराचा निला-
जरेपणा अधिकच ठळक दाखविण्यांत आला आहे.
इतक्यांत राजाकडून निरोप आला कीं वनमाला ही
जणों काय राजकन्याच आहे, अशा थाटानें तिचा व
धैर्यधराचा लग्नसमारंभ राजधानींतच झाला पाहिजे. या
निरोपाबरोबरच राजानें वनमालेसाठीं अलंकारही पाठ-
विले होते. ते अलंकार घालण्यासाठीं वनमाला पडद्यांत
जाते. दागिने घालून झाल्यावर वनमाला धैर्यधरासमो-
रून देवदर्शनाला जात असतां ती नाचत गेली असें
धैर्यधराला वाटलें ! " इतक्या दागिन्यांनीं फुलल्यानंतर
तिचें पाऊल साहजिकपणें नाचल्यासारखें पडावें यांत
आश्चर्य नाहीं " असा सिद्धांतही त्यानें ठरवून टाकिला !
इतक्यांत विलासधर व लक्ष्मीधर येतात. त्यांना वनमाला
हीच भामिनी हें ठाऊक असतां ते धैर्यधराला असा
प्रश्न करतात " राजकन्येशीं आपलें लग्न ठरलें, हें खरें
ना ?" धैर्यधरही खुलून सांगतो " हो, खरें ! " वनमाले-

बरोबर विवाह करण्याचा धैर्यधराचा उद्देश स्पष्ट दिसत असतां, विलासधर व लक्ष्मीधर हे ' आतां भामिनी लक्ष्मीधरालाच उपलब्ध होणार ' अशा समजुतीनें धैर्य-धराबरोबर भाषण करितात ! पुढें, धैर्यधर वनमालेच्या बापाची वाट पहात आहे. पण त्याच्या ऐवजीं भामिनीचे वडील बाबासाहेब आल्याचें पाहून त्याला आश्चर्य वाटतें. बाबासाहेब ह्मणाले " अहो, मी खरें खरें सांगतों, मला वनमाला व तिचे वडील बिलकुल माहीत नाहींत. " धैर्यधरानें विचारलें " मग तुह्मी येथें कां आलां ? " बाबासाहेबांनीं उत्तर दिलें " कां आलो ? अहो मला निरोप आले, पत्रें आलीं, कीं आपण भामिनीशीं लग्न करायला तयार आहां ह्मणून! " " हें आपणास कोणी सांगितलें?" " हिनें. " " काय माझ्या वनमालेनें तुमची ही अशी थट्टा केली ? " " या माझ्या भामिनीनेंच मला तसें सांगितलें. " भामिनीही ह्मणाली " होय, मीच सांगितलें. " त्याबरोबर धैर्यधरानें भामिनीच्या उत्कृष्ट आच-रणाची तारीफ केली व बाबासाहेबांनीं तिचा हात त्याच्या हातीं दिला ! झालें संपलें नाटक ! असलें नाटक पाहून प्रेक्षकांनीं हंसावें कीं रडावें ?

या नाटकांतील गुणदोषांसंबंधानें थोडक्यांत असें ह्मणतां येईल कीं तें सर्वांगांनीं दोषपरिपूर्ण आहे हाच एक त्यांतील गुण असून, त्यांतील मुख्य दोष तें रा० खाडिलकरांसारख्या कसलेल्या लेखकाच्या लेखणीं-तून निर्माण झालें आहे हा होय ! किंवा हवें तर असें

म्हणावें कीं या नाटकाचा प्रयोग पाहण्यास लोकांच्या झुंडींच्या झुंडी जातात हाच तेवढा त्याचा गुण असून, किर्लोस्कर मंडळी त्या नाटकाचे प्रयोग करीत असते हाच त्याचा मुख्य दोष होय! रा० खाडिलकरांनीं असलें नाटक ल्याहावें व किर्लोस्कर मंडळीनें तें रंग-भूमीवर आणावें या दोन्ही गोष्टी महाराष्ट्र नाट्यकलेच्या खडतर दुर्भाग्याचीच साक्ष पटवितात. नाट्यकलेचा उत्कर्ष करण्याचें काम नाटककर्ते व नाटक मंडळ्या यांचेंच आहे. लोकांची अभिरुचि उच्च दर्जाची करणें हें त्यांचेंच कर्तव्य आहे. नाटकाला जाणारे लोक आपली घटकाभर करमणूक करून घ्यावी येवढ्याच साठीं प्रायः जात असतात. त्यांची नाटकांतील गुण-दोषांकडे क्वचितच नजर जात असते. कोठें भजनाचा थाट, कोठें मंडईचा देखावा, कोठें मढें जाळण्याचा समारंभ, कोठें सार्वजनिक विहिरीवरील सीन, कोठें भूत पिशाच्चांची रेलचेल, कोठें नायकिणींची बैठक, कोठें दारूबाजीचा तमाशा, कोठें गणपति-सरस्वतींची कुचेष्टा, कोठें पलटणींची परेड, कोठें भोजनाचा व आर्या म्हणण्याचा हैदोस, कोठें तासेवाजंत्र्यांचा कडकडाट, कोठें तोतरें बोलणारें पात्र, कोठें सोडावाटर, बिड्या, पट्ट्या यांचा फडशा पाडणारे नट, कोठें सोनार, शिंपी, भट, बैरागी, मारवाडी, पारशी वगैरेंची नक्कल, कोठें संगीत झगडे, कोठें प्रत्यक्ष लट्ठालट्ठी, पडापड व रडारड, कोठें शृंगारातिरेक, कोठें बीभत्सपणाची कमाल, कोठें

पोरींचा नाच, कोठें पोरांचा इटिदांडू—वगैरे तऱ्हेचे प्रसंग नाटकांत घुसडले ह्मणजे सामान्य जनांस नाटक पसंत झालेंच पाहिजे! परंतु नाटकांतील संविधानकास आवश्यक नाहींत असे ग्राम्य प्रकार नाटकांत आणून त्यांसच विशेष महत्व दिलेलें असलें ह्मणजे रसिक व मार्मिक प्रेक्षकांचा मात्र पुरा हिरमोड झाल्यावांचून राहत नाहीं.

संगीत मानापमान नाटकांत हीच स्थिति प्रामुख्यानें नांदत आहे. आधीं या नाटकांतील कथाभाग अत्यंत अल्प आहे व त्या कथानकाशीं ज्यांचा अवश्यमेव संबंध असावयास पाहिजे अशीं अवघीं तीनच पात्रें आहेत. धैर्यधर, भामिनी व लक्ष्मीधर हींच तीं पात्रें होत. सबंध नाटकांतील असलेंनसलेलें सर्व कथानक हीं तीन पात्रें व दोनतीन दासदासी यांच्याकडून यथास्थितपणें नटवितां येण्यासारखें असून नाटकांत विनाकारण पात्रांची रेलचेल उडवून देण्यांत आली आहे. रा० खाडिलकर हे 'बायकांच्या बंडा'चे उत्पादक असल्यामुळें व किर्लोस्कर मंडळींत 'बायकांचा फंड' मोठा असल्यामुळें उभयतांनींही स्त्रीपात्रें सवंगसुकाळ करण्यांत एकमेकांवर ताण केली असल्यास त्यांत आश्चर्य कसचें? नटल्या सजलेल्या बायकांचा तांडाचा तांडा स्टेजवर येऊन धुमाकूळ घालूं लागला, तर स्टेज शोभायमान दिसल्यावांचून कसा राहील? त्यांच्या नृत्यगायनाची व फुगड्यांची मौज कोणाला

आवडणार नाहीं? 'कंट्री' नाटकांबरोबरच लयास गेलेली तरवारी फिरविण्याची कला रा. खाडिलकरांनीं या नाटकांतही पुनः उद्धारलेली असून ह्या तरवारींच्या खेळांत स्वतः भामिनीही मोठी बहार उडवून देते, मग संगीत मानापमान नाटक 'लोकप्रिय' कां बरें होऊं नये? सामान्य जनांना मानापमान नाटक मनोवेधक वाटण्याचें आणखी एक कारण ह्मटलें ह्मणजे लक्ष्मीधर नामक मूर्खाचा अस्वभाविक बाष्कळपणा हें होय. सारांश स्त्री पात्रांचा फाजील भरणा, स्त्रियांचा नाच, चोरांबरोबरची चकमक व लक्ष्मीधराचा अथ पासून इति पर्यंत बाष्कळपणा, हे चार निरर्थक प्रकार वगळून जर 'मानापमान नाटकाचा प्रयोग करण्याचा प्रयत्न होईल तर तें नाटक तात्काळ नामशेष होईल अशी आह्मांस फार फार भिती वाटते!

प्रस्तुत नाटकाचें रहस्य व धोरण, रा. खाडिलकरांनीं पुढें दिल्याप्रमाणें प्रस्तावनेंत वर्णन केलें आहेः— "गरिबांना कस्पटा प्रमाणें लेखणारा अविचारी श्रीमंतांचा दुरभिमान व अपमान झाल्यामुळें चिडलेल्या गुणी गरीबांचा क्रोध, या मानापमानाच्या कात्रींत सांपडल्यामुळें दोन वेळां मोडलेलें धैर्यधर व भामिनी यांचें लग्न खऱ्या प्रेमाचा पगडा मनावर बसून निराभिमानी बनलेल्या भामिनीच्या चतुर लीनतेनें अखेरीस कसें घडून आलें यांचें वर्णन या नाटकांत केलें असून अंगा-

अर दागिन्यांचीं ओझींच्या ओझीं लादून घेणाऱ्या लक्ष्मीधराचा आचरटपणा आणि गरिबांविषयींचा तिरस्कार अंगीं भिनल्यामुळें गुणी गरिबांचा द्वेष करणाऱ्या विलासधराचा खुनशीपणा या दोन तटांमधून सदर प्रेमाचे प्रवाहास—तो स्पष्ट, जोराचा व मर्यादित दिसावा ह्मणून वहावयास लाविलें आहे." ग्रंथकर्त्यानें वर्णन केलेलें हें धोरण प्रस्तावनेंतच राहिलें आहे. नाटक उलथून पालथून कितीही बारकाईनें वाचून तपासून पाहिलें तरी त्यांत श्रीमंतांचा दुरभिमान सांपडत नाहीं; अपमानामुळें उद्भवलेला क्रोध दिसत नाहीं; या दोहोंच्या कात्रींत कोणी सांपडल्याचें नजरेस येत नाहीं; किंवा तशा प्रकाप्रकारच्या कात्रींत सांपडल्याच्या कारणामुळें धैर्यधर व भामिनी यांचें लग्न दोनदां किंवा एकदांही मोडल्याचें आढळत नाहीं! तसेंच भामिनीच्या खऱ्या प्रेमाची साक्ष पटविणारा एकही प्रसंग या नाटकांत नाहीं, किंवा ती निरभिमानी बनून लीन झाली व तिच्या चतुर लीनतेनें धैर्यधराचा क्रोध शांत होऊन तो तिचेशीं लग्न करण्यास कबूल झाला असेंही दृष्टोत्पत्तीस येत नाहीं! लक्ष्मीधराच्या अंगावरील दागिन्यांचीं ओझीं व त्याचा आचरटपणा-मग तो कितीही अस्वाभाविक व मूर्खपणाचा असो—यांचें प्रदर्शन मात्र ग्रंथकर्त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें या नाटकांत भरपूर आहे. पण गुणी गरीबांचा द्वेष करणाऱ्या विलासधराच्या खुनशीपणाचा मात्र या नाटकांत कोठें पत्ता लागत नाहीं! खुनशीपणामुळें एखा-

ह्याच्या लग्नाला विघ्न येऊं शकेल, पण आचरटपणामुळें तसें होणें कसें शक्य आहे कोण जाणे ! कसेंही असलें तरी खुनशीपणाचा तट या नाटकांत नाहीं व आचरटपणा या नाटकांत कितीही भरलेला असला तरी तो कांहीं तट नव्हे; त्या अर्थी या दोन तटांच्या मधून "प्रेमाच्या प्रवाहास—तो स्पष्ट, जोराचा व मर्यादित दिसावा ह्मणून वहावयास लाविलें आहे," हें ग्रंथकर्त्याचें इंगित पुस्तकांतील प्रस्तावनेप्रमाणें रंगभूमीवरील एखाद्या 'मालाधरा'नें सांगितल्यावांचून प्रेक्षकांना कळणें सर्वथैव अशक्य आहे, हें सांगावयास नकोच !

रा. खाडिलकरांनीं 'श्रीमंतांचा दुरभिमान' ह्मटला आहे, तो कोणत्या श्रीमंतांचा ? त्यांच्या नाटकांत झाडून सारे श्रीमंतच भरलेले दिसतात ! धैर्यधर तेवढा एकटा बापडा पहिल्या दोन अंकापुरता 'दरिद्री' बनविलेला आहे. धैर्यधराचें नांव निघालें ह्मणजे त्या नांवामागें 'दरिद्री' ही पदवी जोडल्याशिवाय बहुधा कोणतेंच पात्र बोलत नाहीं ! तरी पण भामिनीचें लग्न लावून देण्याचा ज्याला अधिकार होता तो तिचा बाप मात्र धैर्यधराबद्दल आदरभाव अचूक बाळगतो ! बाबासाहेबांना श्रीमंतीचा दुरभिमान नव्हता, इतकेंच नव्हे तर धैर्यधरावर त्यांचें अकृत्रिम प्रेम होतें व हरएक प्रसंगीं ते त्याला मदतही करीत असत, अशी खुद्द धैर्यधराचीच साक्ष आहे. (पृ० ७६ पहा.) फार तर काय, पण भामिनीला धैर्यधराला देण्याची योजना बाबासाहे-

बांनींच केलेली होती. असें जर आहे तर भामिनीसारखी रूपवती तरुणी एखाद्या गरीबाला लाभते म्हणून शेजार-पाजारच्या श्रीमंतांच्या कितीही पोटांत दुखलें तरी त्याचा काय परिणाम होणार आहे ? भामिनीचें लग्न ‘ दरिद्री ’ धैर्यधराशीं होऊं नये अशी इच्छा प्रस्तुत नाटकांतील कित्येक खोगीरभरतीच्या पात्रांचीही होती. पण भामिनी जर धैर्यधराला वरण्यास कबूल असती, तर तिला दुराग्रहानें हरकत करण्याचा त्यांपैकीं कोणा-सही अधिकार नव्हता व तसा अधिकार चालविण्याचा प्रयत्नही या नाटकांत कोणीं केलेला नाहीं ! मग ‘ अवि-चारी श्रीमंतांच्या दुरभिमाना ’ मुळें बापड्या सुविचारी भामिनीचें दोन वेळां लग्न मोडलें अशी लोणकडी थाप रा. खाडिलकरांनीं कशासाठीं मारली आहे हें त्यांचें त्यांसच माहीत ! खरा प्रकार असा आहे कीं बाबासा-हेबांनीं धैर्यधराला भामिनीशीं विवाह करून घेण्याला बोलाविलें व आपली भावी वधू काळी आहे कीं गोरी आहे, लंगडी आहे कीं लुली आहे, याचीही चौकशी न करतां, कसलीही बायको झाली म्हणजे झालें, अशाच समजुतीनें जणों काय धैर्यधर धांपा टाकीतच येतो. पण भामिनी कसली वस्ताद ! तिनें असल्या अधाशी वराचें तोंड देखील पाहिलें नाहीं ! उलट त्याच्या तोंडावर ( पण रा. खाडिलकरांच्या सोयीसाठीं त्याच्या तोंडा-कडे न पाहतां व आपलेंही तोंड त्याला न दाखवितां ) “ तो दरिद्री आहे ” या सबबीवर तिनें त्याच्याशीं लग्न

करण्याचें साफ नाकारलें. या प्रसंगींचें तिचें उद्धट वर्तन तूर्त बाजूस ठेवूं. कारण येथें मुद्याची गोष्ट आहे ती ही कीं एखादा तिमाजी नाईक किंवा चिमाजी आप्पा कितीही शूर व गुणी असला, तरी श्रीमंतांच्या प्रत्येक पोरीनें त्याच्याशीं लग्न लावण्यास तयार असलेंच पाहिजे कीं काय? तशा त्या तयार नसल्या आणि वर गरीब आहे येवढ्याच कारणामुळें नसल्या, तरी त्या सर्वांना दुरभिमानी ह्मणणें रास्त होईल काय? धैर्यधराचें भामिनीवर प्रेम जडलेलें नाहीं, व भामिनीचें धैर्यधरावर जडलेलें नाहीं अशा वेळीं त्या उभयतांचें लग्न कोणत्याही कारणामुळें मोडलें तरी त्याबद्दल जरी आप्तसंबंधामुळें रा. खाडिलकरांस कितीही रडें कोसळलें, तरी प्रेक्षकांना त्याबद्दल यत्किंचितूही खेद वाटणें शक्य नाहीं!

बाबासाहेबांनीं भामिनीला देवीची माला धैर्यधराच्या हातीं टाकण्यासाठीं बाहेर बोलावलें, तेव्हां तिनें कसें उद्धटपणाचें उत्तर दिलें तें मागें एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. त्या उत्तरानें धैर्यधराचा फारच मोठा अपमान झाला हें उघड आहे. परंतु काय चमत्कार सांगावा! तशा प्रकारच्या अपमानानें एखाद्या शेळपट पोरानें देखील "अपमान, अपमान" "सूड, सूड" या शब्दांनीं दाही दिशा दणाणून सोडल्या असत्या! पण आमच्या त्या 'गुणी गरीबाला'—ह्मणजे अर्थात् धैर्यधराला—क्रोध कसा तो मुळीं आलाच नाहीं! "काय माझें फुटकें नशीब! बिनखर्चानें बायको मिळत होती

ती बुडाली ! दुसरी बायको विकत आणायाला आतां शेदोनशे रुपये मात्र काढावे लागणार ! नशीब ! नशीब !! नशीब !!! " असेंच जणों काय ह्मणत धैर्यधर रडत परत जात आहे ! पण ग्रंथकार ठांसून सांगतात कीं धैर्यधर व भामिनी यांचें लग्न अविचारी श्रीमंतांचा दुरभिमान व अपमान झाल्यामुळें चिडलेल्या गुणी गरिबांचा क्रोध यांच्या कात्रींत सांपडलें होतें ! किती धाष्ट्यांचें हें विधान ! नवरीच लग्नाला कबूल नसल्यामुळें लग्न मोडलें असतांना, नवरा रागावला ह्मणून लग्न मोडलें असें ज्या अर्थी रा. खाडिलकर सांगतात, त्या अर्थी नवऱ्याचे गुण झांकून ठेवण्याच्याच लायखीचे असले पाहिजेत, असें अनुमान काढण्यावांचून गत्यंतर नाहीं ! धैर्यधर व भामिनी यांचें परस्परांवर प्रेम जडलेले होतें; धैर्यधराचा अपमान तिच्या बापाकडून झाला; त्यामुळें धैर्यधर संतापास चढला; त्यानें महत्प्रयासाअंतीं तिच्या बापास दांतीं तृण धरावयास लाविलें; आणि मग तिच्या बापास तिचा हात धैर्यधराच्या हातीं देणें भाग पडलें, असा कथाभाग जर रा. खाडिलकरांनीं ह्या नाटकांत जुळवून आणिला असता, तरच त्यांनीं प्रस्तावनेंत नमूद केलेलें धोरण खरें ठरलें असतें. पण प्रस्तुत नाटकांत धैर्यधराचा अपमान खुद्द भामिनीकडूनच करविला असल्यामुळें आरंभापासून शेवटपर्यंत ह्या नाटकाची जास्त जास्तच घाण होत गेली आहे. भामिनीनें केलेल्या आपल्या अपमानाबद्दल धैर्यधरानें

तिचा एका शब्दानेंही पाणउतारा करण्याचा प्रयत्न केलेला नाहीं, किंवा केलेल्या अपराधाबद्दल धैर्यधरासमोर भामिनीच्या तोंडांतून पश्चात्तापाचा चकार शब्द देखील निघालेला नाहीं. अपमानाची गोष्ट दोघेंही साफ विसरून गेलीं आहेत. प्रेक्षकांना मात्र त्या अपमानाचें स्मरण शेवटपर्यंत राहतें ! हुबळीधारवाडकडचे कित्येक कन्नडआप्पा प्रस्तुत नाटक समग्र पाहून झाल्यावर असें विचारतात कीं " या नाटकांत ' मानाप्पा ' अजून कसा आला नाहीं !" खरोखरच, या नाटकांत ' मानापमानाचा ' कांहीं संबंधच नाहीं !

वरील विवेचनावरून धैर्यधर व भामिनी यांचें लग्न पहिल्या खेपेस तरी ' कात्रीं ' त सांपडलें नव्हतें हें स्पष्ट झालें. दुसऱ्यांदा लग्न मोडलें, त्या वेळींही नाटककर्त्यांची ' कात्री ' कोठें दिसत नाहीं. पहिल्या खेपेस धैर्यधर व भामिनी यांनीं एकमेकांस पाहिलें देखील नव्हतें. दुसऱ्या खेपेस धैर्यधराचें प्रेम वनमालेवर बसलें होतें. वनमाला हीच भामिनी हें धैर्यधरास माहीत नव्हतें, इतकेंच नव्हे तर दुसऱ्या खेपेसही भामिनी त्याच्या दृष्टीस पडली नाहीं ! ती त्याच्या दृष्टीस पडली असती, तर भामिनीनेंच वनमालेचें सोंग घेतलें होतें हें त्यानें सहज ओळखलें असतें व तिचेशीं विवाह करण्यास तो कबूलही झाला असता. परंतु 'वनमाला' नामक निराळ्याच स्त्रीवर (अर्थात् त्याच्या समजुती प्रमाणें)' त्याचें आधींच प्रेम बसलेलें असल्यामुळें एरवीं तरी त्यानें

भामिनीशीं लग्न केलें असतें काय ? मग दुसऱ्या खेपेसही त्यानें जें भामिनीला नाकारलें त्याचें कारण त्याच्या ठिकाणीं भामिनीनें केलेल्या अपमानामुळें उद्भवलेला क्रोधच होय असें कसें ह्मणतां येईल ? क्रोधामुळें त्याचें व भामिनीचें लग्न दुसऱ्या खेपेसही मोडलें नाहीं याचा पुरावा प्रस्तुत नाटकांतच आहे. शेवटच्या अंकांतील शेवटच्या पृष्ठापर्यंत त्याला भामिनी ही 'वनमाला' या एकाच नांवानें प्रत्यक्ष माहीत होती. शेवटच्या पृष्ठांत जेव्हां वनमाला हीच भामिनी होती असें त्याला आढळून आलें, तेव्हां त्याला तिनें पूर्वी केलेल्या अपमानाचें स्मरण होऊन तिच्याविषयीं- भामिनीविषयीं- वनमाले विषयीं- थोडा तरी- क्षणभर तरी- तिरस्कार उत्पन्न होणें अगदीं स्वाभाविक व जरूर होतें. पण तसें कांहीं एक न होतां तिचें त्यानें तात्काळ पाणिग्रहण केलें आहे. या त्याच्या स्वभावावरून जर पाहिलें तर दुसऱ्याच खेपेस-जर भामिनी आणि वनमाला हीं एकच आहेत असें त्याच्या दृष्टीस पाडलें असतें तर-त्यानें तिचेशीं पूर्वीचा अपमान विसरून हंसतच लग्न केलें असतें, यांत संशय कशाचा ? सारांश, दुसऱ्या खेपेचें लग्नही श्रीमंतांचा दुरभिमान व गरिबांचा क्रोध यांच्या कात्रींत सांपडून मोडलें हें ह्मणणें निखालस खोटें आहे.

आतां दुसऱ्या खेपेचें लग्न जुळविण्याची व तें मोडण्याची तऱ्हा किती हास्यास्पद आहे हें पाहून मग

पुढें जावें असें आह्मांस वाटतें. भामिनीनें वनमालेच्या रूपानें धैर्यधराला मोह पाडिला होता. या मोहांत तो पुरा गुरफटला आहे अशी संधि पाहून वनमालेनें वेताबातानें त्याला आपणच भामिनी आहों असें कळविलें असतें आणि मग तिनें त्याच्याशीं विवाह करण्याचें मनांत आणिलें असतें, तर तें यथायोग्य झालें असतें. पण प्रस्तुत नाटकांत सगळेंच विपरीत आहे. धैर्यधर वनमालेच्या मोहजालांत सांपडला आहे, अशा वेळीं त्याला वैभव प्राप्त झालें व तो बाबासाहेबांच्या भेटीसाठीं ह्मणून नगरांत आला. तों त्याच्यापूर्वीं भामिनी आपल्या बापाच्या घरीं तयार ! आणि घरीं येऊन तिनें केलें काय ? तर मार दागिनेच दागिने तिनें आपल्या आंगावर लादून घेतले आणि त्याच्याशीं बसल्या बैठकीला लग्न उरकून घ्यावें अशा उत्कंठेनें तिनें अगदीं घाई उडवून दिली ! एवढा नट्टापट्टा केल्याप्रमाणें व इतकी आतुरता दाखविल्याप्रमाणें तिनें नाचत मुरडत धैर्यधरासमोर येऊन त्याला स्वतः बोहल्यावर ओढून नेणें निखालस जरूर होतें कीं नाहीं ? समोरासमोर त्यांची गांठ पडती, व धैर्यधराला कदाचित् पूर्वींच्या अपमानाचें स्मरण होऊन " क्रोध " आलाच असता, तर भामिनीनें आपणास वनमाला नांव घेऊन फसविलें या बद्दल त्या उभयतांमध्यें--वन्स मोअर न झाल्यास--फारतर एखादीच वटका संगीत झगडा झाला असता, पण दुसऱ्या खेपेचा मुहूर्त खास खास वांया गेला नसता !

 १८४९.

मग भामिनीला विंगच्या बाहेर एक पाऊल टाकून पुढें येण्याला कोणाची हरकत होती? 'खुनशी' विलासधराची काय? किंवा 'आचरट' लक्ष्मीधराची काय? छे, ते बिचारे नाटक केव्हां संपते आणि आपणास झोंपायास केव्हां मिळते ह्मणून जांभया देत बसले होते! तिला हरकत झाली हें निर्विवाद आहे. पण ती हरकत दुसऱ्या कोणत्याही पात्राकडून नसून खुद्द नाटककर्ते रा. खाडिलकर यांजकडूनच झाली. तिला त्या प्रसंगीं धैर्यधरासमोर येऊं देण्याचें त्यांना धैर्यच नव्हतें. कारण त्यांना पक्कें ठाऊक कीं जर का या वेळेस भामिनीला पुढें जाऊं दिलें तर ती धैर्यधराच्या गळीं पडणार व नाटक तिसऱ्या अंकांतच समाप्त करून टाकणार! असा बिकट प्रसंग येऊन पडल्यामुळें त्यांनीं अशी युक्ति काढलीं कीं त्यानीं भामिनीला बळकट धरून ठेविलें आणि तिच्या बापाला दिलें बाहेर ढकलून! मग बाबासाहेबांचा काय इलाज? त्यांनीं 'भामिनीनें केलेला अपमान विसरून जा व तिला पदरांत घ्या' अशी धैर्यधराला विनंति केली, पण त्यानें ती अर्थातच नाकारली. ज्या उद्धट पोरीनें पूर्वींच्या प्रसंगीं आपल्या बापाला "नाहीं, मी साफ येणार नाहीं. पुन्हा सांगते मी साफ येणार नाही" असा हलकटपणाचा जबाब दिला होता, तीच भामिनी आतां मोठी लीन व गुणीबाळ बनली असेल असा धैर्यधराचा तर्क होणेंही शक्य नव्हते. त्यानें पूर्वीप्रमाणें लग्नास उभें राहावें आणि

तिनें दुप्पट रागानें 'पायांतलें' घेऊनच त्याच्या पाठीस लागावें, असें झालें असतें तर बापड्याची पळतां वाट पुरे झाली नसती काय? असो, तर प्रथमारंभींच भामिनीकडून धैर्यधराचा अपमान करविण्याची ग्रंथकर्त्यांची घोडचूक झाल्यामुळें संबंध नाटक विस्कळीत व त्यांतील सर्व प्रसंग हास्यास्पद होत गेले आहेत. नाटक ल्याहावयास बसतेवेळीं भामिनीनेंच धैर्यधराचा अपमान करावा असें ग्रंथकर्त्यानें मुळींच योजिलेलें नसावें. तशी जर त्याची बुद्धिपुरःसर योजना असती तर नाटकाचें स्वरूप निराळेंच झालें असतें: धैर्यधर भामिनीचें स्वरूप पाहून तिजवर आसक्त झाला आहे; पण तो गरीब व आपण श्रीमंत या अभिमानामुळें तिनें त्याला झिडकारून त्याचा अपमान केला; या अपमानानें त्याला क्रोध तर आलाच, पण त्याचा तिज विषयींचा मोह मात्र नष्ट झाला नाहीं; मोह व क्रोध यांचा झगडा त्याच्या हृदयांत चालू झाला; तसेंच कांहीं प्रसंग घडून आल्यामुळें भामिनीचें चित्त धैर्यधराकडे जाऊं लागलें, पण तिनें केलेल्या अपमानाच्या स्मरणानें धैर्यधराचें तिजवर प्रेम असतांही तो तिला तुच्छतेनें वागवूं लागला; तरी देखील कृतापराधाच्या पूर्ण पश्चात्तापानें व धैर्यधराच्या कित्येक निरपेक्ष कृत्यांनीं तिचें त्याजवरील प्रेम अत्यंत प्रबळ झाल्यामुळें ती अभिमानरहित होऊन त्याच्याशीं अत्यंत नम्रतेनें व दीनतेनें वागूं लागली; ती त्याच्या धिक्कारानें झुरणीस

लागली; त्याचा तिरस्कार घालवून त्याचें शुद्ध प्रेम संपादण्यासाठीं तिनें पुष्कळ प्रकारचे कष्ट सोसले व शेवटीं त्याच्यासाठीं-त्याच्या प्रेमासाठीं-आपल्या प्रेमासाठीं-तिनें आपला जीवहीं धोक्यांत घातला व अखेरीस उभयतांच्याही प्रेमाचा विजय झाला;—अशा भावार्थाचें कथानक आपणास प्रस्तुत नाटकांत बहुधा आढळून आलें असतें. परंतु पूर्वयोजना कांहींच न केल्यामुळें नाटककर्त्याचें तट्टू एकदां जें भडकलें तें त्यांना शेवट पर्यंत आवरतां आलें नाहीं असें आह्मांस वाटतें. असो.

आतां नाटककर्त्यानें केलेलीं आणखी तीन विधानें राहिलीं. 'भामिनीचें खरें प्रेम,' 'तिची चतुर लीनता' व विलासधराचा 'खुनशीपणा.' लक्ष्मीधराचा 'आचरटपणा' आह्मी कबूलच केला आहे. तेव्हां आतां सदर तीन विधानांचीच कशी वाट लागते ती पाहावयाची.

भामिनीच्या प्रेमाचा पहिल्या अंकांत संबंधच नाहीं. दुसऱ्या अंकांत भामिनीला धैर्यधर मदनाप्रमाणें भासला आहे असा उल्लेख आढळतो. तिसऱ्या अंकांत ती धैर्यधराला वरण्याला अगदीं आतुर झाली आहे असें दाखविलें आहे. चौथ्या अंकांत तिच्या प्रेमाचें 'खरें प्रदर्शन' मांडिलेलें आहे. पण त्यांत 'खरें प्रेम' नाहीं असाच पाहाणाराचा तर्क होतो! कारण त्यांत उभयतांमधील शृंगारिक संवादाशिवाय कांहींच नाहीं. खरें प्रेम विरहप्रसंगानें कसोटीस लागतें. संकटाच्या वेळींच खऱ्या प्रेमाची साक्ष

पटते. सीता, सावित्री, दमयंती यांच्या पतीवरील खऱ्या प्रेमाची साक्ष त्यांचा पतीपासून झालेला विरह व त्यांजवर आलेलीं संकटें, यांच्या अभावीं केवळ शृंगार रसाच्या धबधब्यानेंही — कोणाला पटली नसती. धैर्यधर व भामिनी हीं दोघेंही तरुण व स्वतंत्र व एकांतांत. अशा प्रसंगीं एकमेकांनीं एकमेकांवर कितीही शृंगारिक कोट्या केल्या तरी तेवढ्यावरून त्यांचें प्रेम खरें होतें असें ह्मणण्यापेक्षां त्यांच्या तारुण्याची बाधाच प्रबल होती असें ह्मणणें अधिक योग्य होणार नाहीं काय? वनमाला ही एका बागेंत राबणाऱ्या माळ्याची मुलगी या बतावणीनें भामिनी धैर्यधराची दासी होऊन राहिली होती. ह्या दासीपणाचा संबंध वाचकांच्या व प्रेक्षकांच्या डोळ्यापुढें असल्यामुळें धनी व दासी यांजमधील प्रेमसंवादही किळसवाणाच वाटतो. तशांत भामिनीवर दुर्दैवानें दासीपणाचा प्रसंग आलेला असता व आपलें मोहक स्वरूप व मर्यादशील आचरण यांच्या योगानें ती धैर्यधरास प्रिय होऊन त्याच्या विनवण्यास तिनें मुग्ध प्रकारांनीं आपली संमति दर्शविली असती तर गोष्ट निराळी होती. पण या नाटकांत भामिनीनें जाणून बुजून दासीपणा स्वीकारला होता व त्याला भुलविण्यांत, खुलविण्यांत, व खेळविण्यांत ती आपलें कुलीन कुमारिकेचें शील पायांखालीं तुडवून टाकीत होती. ज्याप्रमाणें तिनें नांव कपटाचें घेतलें होतें, त्याप्रमाणें सदर संवादांतील तिचें ठिकठिकाणचें भाषणही उघड उघड

कपटाचें होतें. ती श्रीमंतीचा तिरस्कार काय दाखविते, भामिनीची निंदा काय करते, एखाद्या श्रीमंताच्या राणीपाशीं मला नोकरीस राहावयाचें आहे असें काय ह्मणते, व धैर्यधराबरोबर शृंगारचेष्टा काय करते! या गोष्टी जर खऱ्या प्रेमाच्या दर्शक असतील तर तसलें 'खरें प्रेम' एखाद्या वेश्येचा प्रवेश नाटकांत घुसडून देखील नाटककर्त्याला तितक्याच बहारीनें खचित दाखवितां आलें असतें. पांचव्या अंकांत भामिनीचें 'नाचल्याप्रमाणें' चालणें व तिचें धैर्यधराकडून पाणिग्रहण अशा दोन महत्वाच्या गोष्टी आहेत! त्यांपैकीं पहिली खऱ्या प्रेमाची निदर्शक कीं दुसरी? सबंध नाटक वाचून पाहिल्यानंतर भामिनीच्या खऱ्या प्रेमाचा सुवास जर कोणास आला तर तो पुरुष खरोखरच धन्य होय असें आह्मी तरी समजूं.

वरील विवेचनावरूनच तिच्या लीनतेचा मासला दिसून येतो. तिला आपल्या अपराधाचा जर पश्चात्ताप वाटलेला नाहीं किंवा आपला अपराध तिनें जर धैर्यधरापाशीं कबूल केलेला नाहीं, तर ती लीन झाली असें रा. खाडिलकरांकडून ह्मणवलें तरी कसें, याचेंच आह्मांस नवल वाटतें. तिनें वनमाला नांव धारण केलें व धैर्यधराचें दास्य पत्करलें हाच जर तिचा लीनपणा असेल तर ती केवळ फसवणूक आहे. वनमालेच्या रूपानें असतां तिनें गरीबीची केलेली तरफदारी व श्रीमंतीची केलेली निंदा हीं बिलकुल अंतःकरणपूर्वक नव्हतीं. कारण पुढें

लवकरच ती दागदागिन्यांनीं अगदीं फुलून गेलेली दृष्टीस पडते ! " माझ्या बाबांच्या मनांत ज्या प्रमाणें कोणाही श्रीमंताला मला देऊन टाकण्याचें येत नाहीं, त्याचप्रमाणें माझ्याही मनाला श्रीमंताशीं लग्न करावें असें स्वप्नांत देखील वाटत नाहीं." (पृ० ९४.) हे वनमालेचे शब्द किती वरें लबाडीचे आहेत ? श्रीमंतीचा तिला खरोखर वीट आलेला नव्हता तो नव्हताच, पण ज्या वेळीं तिनें हें भाषण केलें त्या वेळीं धैर्यधर तिच्या बापापेक्षांही वैभवसंपन्न झालेला होता व अशा त्या श्रीमंताशीं विवाह लावण्याचा तिचा मनांतून बेत चालला होता. मग ' श्रीमंताशीं लग्न करावें असें स्वप्नांत देखील वाटत नाहीं ' हे शब्द तिजकडून वदवून तिला लबाड व धैर्यधराला मूर्ख ठरविण्यापलीकडे नाटककर्त्यानें काय केलें ? कपटप्रचुर भाषणापुरतीच तिची लीनता होती असें नाहीं. नाटककर्त्यानें तिजकडून ' चतुर लीनतेचें ' एक असें छानदार कृत्य करविलें आहे कीं तें पाहून सर्व लीन पतिव्रतांनीं लाजून खालींच माना घालाव्या. त्याची हकीगत अशी कीं लढाई संपल्यावर धैर्यधरानें आपल्या सर्व लष्करास एक महिन्याची रजा दिली, पण कांहीं थोड्या लोकांस आपल्या खासगी कामासाठीं ठेवून घेतलें. त्यांनाही अर्थात् रजा मिळाल्यास पाहिजे होती. तेव्हां त्यांनीं " महाराजांच्या बरोबर हल्लीं असलेल्या " (पृ० ८२) छेलबटाऊकडे—वनमालेकडे—वशिला लाविला. त्या मोहना राणीनेंही,

" जा, तुह्मी आजपासून रजेवर जा " असा रोकडा त्यांच्या अर्जाचा निकाला दिला ! वनमालेचें अद्याप लग्न झालें नव्हतें किंवा धैर्यधरानें तिचेशीं विवाह करण्याची गोष्टही काढली नव्हती, अशा वेळीं तिनें दहा मुलें झालेल्या वयोवृद्ध घरकरणीलाही प्रसंगविशेषींच शोभणारा अधिकार गाजविला ही तिची लीनता, कीं शालीनता, कीं कुलीनता ? असली चतुर बायको मिळणार ह्मणून धैर्यधराच्या जागीं दुसरा कोणी असता तर त्यानें आपला किंवा तिचा कपाळमोक्षच केला असता ! असल्या उद्धट व फाजील स्त्रीचें गौरव करणारे आह्मांस दोनच पुरुष दिसतात. एक रा. खाडिलकर व दुसरा धैर्यधर ! भामिनीची मैत्रीण कुसुम हिला तिचें करणें पसंत न पडून ती तिला ह्मणाली " खरेंच वनमाले, नोकरचाकरांना तूंच रजा दिलीस ह्मणून धैर्यधर तुजवर रागावले तर ? "

**भामिनी**—कांहीं नाहीं रागवायचे.

**कुसुम**—मला गडे भीतिच वाटते; ते रागावले ह्मणजे सगळेंच काम बिनसून जायचें. गरिबांच्या मुली होऊन, या प्रवासांत त्यांच्यांबरोबर राहून सेवाचाकरी करून, त्यांची मर्जी संपादन करण्याचे आमचे सगळे उद्योग अशा एखाद्या अविचारानें एकदम फसायाचे.

**भामिनी**—इतकी नको धास्ती बाळगायला. मला वाटतें माझी छाप त्यांच्या मनावर हळूहळू बसत

चांदण्या रात्रीं खोटी दाढी लावून घेऊन लक्ष्मीधराबरोबर वनमाला उर्फ भामिनी हिला भेवडावण्यासाठीं मात्र एकदां गेला आहे. तेवढ्याशा पोरखेळाबद्दल त्याला चोरां-करवीं खरपूस शिक्षा नाटककर्त्यानें केली असून पुनः त्यालाच खुनशी ह्मणणें ह्मणजे निवळ निवळ धाष्टर्यच होय. भामिनीचें 'दरिद्री' धैर्यधराबरोबर लग्न होऊं नये ह्मणून त्यानें कोणतें खुनशीपणाचें कृत्य केलें? त्यानें काय भामिनीला लपविलें कीं धैर्यधराला बांधून घातलें, कीं खोट्या निनांवी अर्ज्या करून त्याच्या नोकरीवर गदा आणिली, कीं त्याजवर खोटा आळ आणून त्यास सुळावर देवविण्याची तजवीज केली, कीं त्याला विद्रूप केलें, कीं भामिनी विषयीं त्याच्या मनांत कुकल्पना भर-वून देण्याचा भयंकर व्यूह राचिला, कीं काय त्यानें असें केलें ह्मणून त्याला खुनशी ह्मणावें हें रा. खाडिलकर सांगतील तरच स्पष्ट होईल; एरवीं दुसऱ्या कोणाकडूनही तें कोडें सुटेल असें आह्मांस वाटत नाहीं.

येथवर रा. खाडिलकरांनीं प्रस्तावनेंत केलेली प्रतिज्ञा व विधानें हीं झाडून सर्व कशीं खोटीं आहेत हें सिद्ध करून दाखविलें. तसेंच वर झालेल्या विवेचनावरून रा. खाडिलकराचें मानापमान नाटक कसें 'अद्धा तद्धा भविष्यति' असें बनलें आहे हेंही स्पष्ट झालें आहे. तेव्हां आतां काय शिल्लक राहिलें? शिल्लक तर खूपच आहे. ही शिल्लक दोषांची. एक दोन दोषांची नव्हे तर असंख्य दोषांची. त्या सर्वांचें वर्णन करणें अर्थातच शक्य

नाहीं. तथापि "**फूल नाहीं फुलाची पाकळी**" ह्मणून खालीं कांहीं दोषांचें आविष्करण करीत आहों.

**दोष** १. ला-प्रस्तुत नाटक कोणत्याही एका विवक्षित कालाला अनुलक्षून लिहिलेलें नाहीं. भारतरामायणाच्या कालापासून तों हल्लींच्या कालपर्यंत सर्व काळांची यांत बिनदिक्कत खिचडी केलेली आहे. पात्रांची नांवेंच पाहिलीं तरी तीं निरनिराळ्या कालींच शोभेशीं आहेत. भामिनी हें नांव एका कालचें; कुसुम, चंपा, मालती, हीं दुसऱ्या कालचीं; वनमाला, पुष्पमाला, हीं तिसऱ्या कालचीं; धैर्यधर, लक्ष्मीधर, शीलधर, विलासधर, पृथ्वीधर हीं नांवें धरणीकंपाच्या कालचीं; विनोद हें नांव शेक्सपियरच्या कालचें; आणि अक्कासाहेब, बाबासाहेब हीं नांवें बाजीरावाच्या कालची असावींत असा भास होतो. या नाटकांतील चालीरीती ( पदांच्या नव्हे ) पाहिल्या तर त्यांतही कालाच्या दृष्टीनें मेळ नाहीं. प्रीतिविवाह्याचा काल कोणता ? सीमंतपूजन, मंडप, बोहलें, यांचा काल कोणता ? वधूनें वराला देवीच्या गळ्यांतील माळ प्रसाद ह्मणून देण्याची चाल कोणत्या कालची ? नवरदेवाच्या मिरवणुकींत नवरदेव कोणता हें ओळखतां येऊं नये अशा रीतीनें वाटेल त्या फाटिंगांनीं आपला वरघोडा काढण्याची चाल कधीं होती ? लग्नाचा मुहूर्त 'परवां' ( पृ० १३ ) असतांना 'उद्याचें उद्यां' ( पृ० १७ ) लग्न आटपण्याची सोय कोणत्या कालीं होती ? नवरीनें नवऱ्याला लाजण्याची [ पृ० २१ ]

चाल कधींची ! तरुण अविवाहित स्त्रियांनीं लष्कराच्या छावण्यांतून भटकण्याचा प्रघात कोणत्या कालचा ? ( पृ० २३ ) ह्या सर्व भिन्नभिन्न व परस्परविरुद्ध चालीरीती एकाच कालच्या असणें शक्य नाहीं. तसेंच सामान्यतः पाहिलें तर नाटकांतील कथानक हल्लींच्या काळचें नाहीं हें स्पष्ट दिसतें. कारण यांत स्वतंत्र राजे, त्यांचे सेनापति, युद्ध, तह वगैरे प्रकार आहेत. कोणत्या तरी मागील कालची गोष्ट सांगण्याचा जर ग्रंथकर्त्याचा हेतु होता, तर त्या कल्पित मागील कालालाच त्यानें चिकटून राहणें जरूर होतें. पण ( पृ० ५६ ) " अक्का०—कां आतां बोलत कां नाहीं ? हिथें शहरांत असतांना रोज कांहींना कांहीं नवी सबब सांगून आह्मां बायकांना फसवायला ठीक पडतें ! आज काय लक्ष्मीधरजींच्या घरीं गाणें आहे, उद्यां काय नाटकाचें आमंत्रण आहे, असें ह्मणून रात्रींच्या रात्री बाहेर काढणें शोभून जातें ! कोणच्याशा देशांत सांगतात तशीं नाटकें आमच्या या शहरांत रोज होत नाहींत, हें आह्मां बायकांचें भाग्यच सयाजायचें ! तसें झालें तर मी तर सगळ्या गाणाऱ्यांना आणि नाटकवाल्यांना शाप देईन, मेल्यांचें देव निसंतान करो! " पुनः ( पृ० ६२ ), " लक्ष्मीधर—....आह्मी बायकांसारखे केंस नाहीं कां ठेवीत, तिरपा भांग नाहीं का काढीत ? " या दोन उताऱ्यांवरून नाटककर्त्यानें अक्कासाहेबांना मेण्यांतून काढून मोटार गाडींत बसविलें व लक्ष्मीधराचे

दागदागिने लुबाडून घेऊन, त्याला जबरदस्तीनें बूट-इष्टाकिण्या नजर केल्या असें दिसून येत नाहीं काय? रा. खाडिलकरांसारख्या चाणाक्ष लेखकाला प्राचीन कालच्या गोष्टींत हल्लींच्या काळच्या विशिष्ट परिस्थितीचा उल्लेख टाळण्याइतकेंही तारतम्य राहूं नये हें आश्चर्य होय. अथवा हें आश्चर्य कसचें? त्यांच्या प्रस्तुत नाटकाचें संबंध स्वरूप जर पाहिलें तर भामिनी पियानो वाजवीत आहे, धैर्यधर नारदाला प्रमाण करीत आहे, विलासधर शंभर स्त्रियांसहवर्तमान पुष्पक विमानांत बसून चालला आहे, लक्ष्मीधर प्रामिसरी नोटांची पुडकीं सोडून पहात आहे, बाबासाहेब हैदर अल्लीबरोबर ताजमहाल हाटेलांत सेमिरामिस राणीची स्वारी कशी फेटाळून लावावी या बद्दल खलबत करीत आहेत, आणि अक्कासाहेब कौरवस्त्रियांसमवेत आगबोटींत बसून दशकंठाच्या घरीं बॉल खेळायाला जात आहेत, असे देखावे या नाटकांत नाहींत हेंच खरोखर आश्चर्य होय!

दोष २ रा—प्रस्तुत नाटकांत 'विनोद' नांवाचें एक पात्र आहे. त्याच्या नांवावरून तें हास्यरस उत्पन्न करण्याकरितां योजिलेलें आहे असें दिसतें. तसा जरी हेतु असला, तरी त्याचा विनोदाशिवाय नाटकाच्या कथाभागाशीं कांहीं तरी निकट संबंध ठेवावयास नको होता काय? मृच्छकटिक, शाकुंतल, सौभद्र वगैरे नाटकांत विदूषकाचें पात्र इतर पात्रांप्रमाणेंच आवश्यक पात्र आहे. त्या पात्रावर त्याच्या योग्यतेप्रमाणें संविधा-

नकाचा परीपोष करणारी अशी कामगिरी त्या त्या नाटकांत सोंपविलेली आहे. पण प्रस्तुत नाटकांत 'विनोद' हा नुसता वात्रटपणा करण्यापुरताच आहे. त्याला जर खाट घातला, तर नाटक जशाचें तसें शाबूत राहण्याला कांहीं हरकत पडणार नाहीं. बहुतेक सर्व लहान मोठ्या शहरांत कांहीं प्रसिद्ध वात्रट पुरुष असतात. ते कोणाचेही मित्र नसतात, पण त्यांच्या विनोदानें आपली करमणूक होते येवढ्यासाठीं त्यांचे मात्र पुष्कळ स्नेही व ओळखीदेखीचे लोक असतात. हे वात्रट कोठें लग्नाला जावोत, मेजवानीला जावोत, सभेला जावोत, फिरायाला जावोत, किंवा कोणाच्या अंत्यविधीला जावोत, यांची त्या त्या प्रसंगाला अप्रस्तुत अशी कोणावर तरी व कशावर तरी अप्रयोजक कोटि लढवून जवळच्या फाजील लोकांना हांसविण्याची हातोटी फारच अप्रतिम असते. परंतु त्यांच्या कोट्यांनीं त्या त्या प्रसंगाचें गांभीर्य नष्ट होऊन समजदार लोकांना खेदच प्राप्त होत असतो. 'विनोद' हें पात्र त्याच वात्रट लोकांच्या वर्गांत घालण्यास योग्य असें नाटककर्त्यानें योजिलेलें आहे. त्याला विनोद करण्यास सवड मिळावी येवढ्याच हेतूनें, कार्यकारणभावही लक्षांत न घेतां निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या पात्रांशीं त्याची गांठ घातली आहे असें सहज ओळखूं येतें. 'विनोद' हा भामिनीचा सेवक. मग सेवक या नात्यानें त्याचें तिचेशीं वर्तन असावयास नको काय?

नाटकाच्या पहिल्याच प्रवेशांत भामिनी, तिची बहीण अक्कासाहेब, व तिच्या मैत्रिणी ह्या 'बाबासाहेबांच्या वाड्यांतील महिषासुरमर्दिनीच्या देवालयांत' गेल्या आहेत, तेथें 'विनोद' कशाला पाहिजे होता? त्यानें तेथें काम काय केलें ह्मणाल, तर इतर बायकांबरोबर त्यानेंही भामिनीची अत्यंत सलगीनें कुचेष्टा केली आहे. जणों काय कोणा एखाद्यास वाटावें कीं तो कोणी तिचा भाऊ किंवा जवळचा आप्तइष्टच आहे! विलासधर हा भामिनीच्या बहिणीचा नवरा. त्याची भामिनीवर कोणत्याही प्रकारची सत्ता असणें शक्य नव्हतें व ती होती असेंही नाटककर्त्यानें कोठें दृष्टोत्पत्तीस आणलेलें नाहीं. पण दुसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत विलासधर व 'विनोद' हे जेव्हां येतात, त्या वेळीं प्रारंभालाच 'विनोद' विलासधराला ह्मणतो "महाराज, माझी एवढी विनंति ऐकाच; आणि माझ्या मागची ही पायपीट चुकवा. अहो, आज ह्या छावणींत तर उद्यां त्या छावणींत, असें भामिनीताईसाहेबांबरोबर फिरतां फिरतां मला पुरे वाट झाली आहे....." भामिनीच्या त्रासांतून मला मुक्त करा असें 'विनोद' विलासधराला ह्मणतो, त्यावरून एखाद्याला वाटेल कीं तो जणों काय विलासधरानेंच भामिनीच्या नोकरीस ठेविलेला त्याचा हेर असावा. या प्रवेशांत 'विनोदा'नें आपल्या विनोदी भाषेनें आपल्या धनिणीच्या हालचाली नाटककर्त्याच्या मतें तिच्या व धैर्यधराच्या लग्नांत विघ्न

आणणारा जो ' खुनशी ' विलासधर त्यांस केवळ विनोदाप्रीत्यर्थ सांगितल्या आहेत. आपल्या धनिणीचें हित पहावयास लावण्याऐवजीं त्याला तिच्या शत्रूशीं हितगुज करावयास लावण्याचें कांहीं प्रयोजनही नव्हतें. जी बातमी ' विनोदा ' कडून देवविली आहे, ती इतर रीतीनें विलासधरास कळवितां आली नसती काय ? पण तसें केलें असतें तर ' विनोदा ' चें विनोद करण्याचें एक ठिकाण कमी झालें असतें ना ! तसेंच तिसऱ्या अंकांतील पहिल्या प्रवेशांत विनोदाची स्वारी अक्कासाहेबाच्या महालांत बसून तिचेशींही विनोदपर गुजगोष्टी करीत आहे. अक्कासाहेबाचा महालही त्या लांबलचक नांवाच्या देवीच्या देवालयाप्रमाणें बाबासाहेबांच्या वाड्यांतच होता काय ? तिचा नवरा विलासधर हा तर मोठा श्रीमंत होता. त्या अर्थीं त्याच्या स्वतःच्या वाड्यांत त्याचा महाल असला पाहिजे हें उघड आहे. मग भामिनीचा चाकर अक्कासाहेबाच्या वाड्यांतील महालापर्यंत कोणत्या निमित्तानें जाऊं शकला ? निमित्त दुसरें कोणतें पाहिजे ? त्याचें तें विनोद करावयास जाण्याचें आणखी एक स्टेशन होतें इतकेंच. पुढें पहावें तो ' विनोद ' बाबासाहेबांच्या वाड्यांत लक्ष्मीधराबरोबर विनोद करायाला हजर आहेच. या प्रसंगीं ' विनोद ' जणों काय लक्ष्मीधराचाच बंदा गुलाम आहे असा भास होतो. [ अंक ३ रा, प्रवेश २ रा. ] तो त्याच्या बरोबर विनोद तर करतोच, पण भामिनीला भुलविण्यासाठीं तो

आणणारा जो ‘ खुनशी ’ विलासधर त्यास केवळ विनोदाप्रीत्यर्थ सांगितल्या आहेत. आपल्या धनिणीचें हित पहावयास लावण्याऐवजीं त्याला तिच्या शत्रूशीं हितगुज करावयास लावण्याचें कांहीं प्रयोजनही नव्हतें. जी बातमी ‘ विनोदा ’ कडून देवविली आहे, ती इतर रीतीनें विलासधरास कळवितां आली नसती काय ? पण तसें केलें असतें तर ‘ विनोदा ’ चें विनोद करण्याचें एक ठिकाण कमी झालें असतें ना ! तसेंच तिसऱ्या अंकांतील पहिल्या प्रवेशांत विनोदाची स्वारी अक्कासाहेबाच्या महालांत बसून तिचेशींही विनोदपर गुज गोष्टी करीत आहे. अक्कासाहेबाचा महालही त्या लांबलचक नांवाच्या देवीच्या देवालयाप्रमाणें बाबासाहेबांच्या वाड्यांतच होता काय ? तिचा नवरा विलासधर हा तर मोठा श्रीमंत होता. त्या अर्थी विलासधराच्या वाड्यांतच त्याचा महाल असला पाहिजे हें उघड आहे. मग भामिनीचा चाकर अक्कासाहेबाच्या वाड्यांतील महालापर्यंत कोणत्या निमित्तानें जाऊं शकला ? निमित्त दुसरें कोणतें पाहिजे ? त्याचें तें विनोद करावयास जाण्याचें आणखी एक स्टेशन होतें इतकेंच. पुढें पहावें तो ‘विनोद’ बाबासाहेबांच्या वाड्यांत लक्ष्मीधराबरोबर विनोद करावयाला हजर आहेच. या प्रसंगीं ‘ विनोद ’ जणों काय लक्ष्मीधराचाच बंदा गुलाम आहे असा भास होतो. [ अंक ३ रा, प्रवेश, २ रा. ] तो त्याच्याबरोबर विनोद तर करतोच, पण भामिनीला भुलविण्यासाठीं तो जे

वेडेचार करतो त्या कामींही त्याच्या आज्ञेप्रमाणें 'विनोद' त्याला मदत करतो. चौथ्या अंकांत भामिनी धैर्यधराची दासी होऊन त्याजबरोबर प्रवास करीत आहे. अशा प्रसंगींही 'विनोद' त्या ठिकांणीं नाटककर्त्यांच्या करामती-मुळें आला आहे. अर्थात् त्याला धैर्यधराबरोबरही विनोद करावयाला सवड करून दिलेली आहे. चार अंकांत ज्या 'विनोदा' ची सोय करतां आली, त्याची पांचव्या अंकांतही योग्य ती सोय झालेली आहे हें सांगावयास नकोच. सारांश, नाटकांतील कथानकाचा व त्यांतील पात्रांच्या स्वभावांचा परिपोष करणें या गोष्टीकडेही शक्य तितकें दुर्लक्ष करून कोणत्या ना कोणत्या सबबी-वर 'विनोदा' ला जिकडे तिकडे घुसडून देणें हेंच ग्रंथकार आपलें मुख्य कर्तव्य समजत होते असें दिसतें. येवढ्या अगत्यानें 'विनोदा' ला इतकें महत्व दिल्या प्रमाणें त्याचा विनोद मोठा हास्योत्पादक असेल अशी एखाद्याची समजूत होईल. पण तसें नाहीं. विनोदाचें खरें रहस्य त्याच्या स्वाभाविकपणांत, प्रांसंगिकपणांत, साहजिकपणांत व आकस्मिकपणांतच असतें. 'मानापमान'तील 'विनोद' हें पात्र बहुतेक ठिकाणीं अस्वाभाविकपणें व जबरदस्तीनें आलेलें असून त्याचें प्रत्येक भाषण—त्याचें प्रत्येक वाक्य—जाणूनबुजून विनोदा करितांच उच्चारलें गेलेलें आहे. त्यामुळें त्याच्या विनोदांत प्रासंगिकपणा, साहजिकपणा, व आकस्मिकपणा, यांचा पूर्ण अभाव झालेला आहे, व ह्मणूनच त्याचा विनोद

रम्यही वाटत नाहीं व हास्यही उत्पन्न करीत नाहीं. प्रयोगाचें प्रसंगीं तर तें पात्र विनोदी आहे अशी आमची कल्पनाही झाली नाहीं. प्रयोग पहात असतां या पात्राकडे जेव्हां विशेष लक्ष जाई त्या वेळीं आमची अशी समजूत होई कीं हें एक हलकीं कामें करणारें क्षुद्र पात्र असल्यामुळें इतर महत्वाचीं पात्रें त्याच्या फाजीलपणाकडे दुर्लक्ष करितात, नाहींपेक्षां त्याची बत्तिशी पाडावयाला त्यांनीं कमी केलें नसतें. परंतु जेव्हां नाटकाचें पुस्तक घेऊन आह्मी तें लक्षपूर्वक वाचून पाहूं लागलों, तेव्हां ‘ विनोद ’ हा विनोदाचा प्रोफेसर ह्मणूनच त्याला मोठ्या प्रयासानें नाटकांत आणिलेला आहे असें आह्मांस अढळून आलें! तो इतर प्रसिद्ध नाटकांतील विदूषकांप्रमाणें भोळा, खुळा, वाचाळ, खादाड, इमानी पण विक्षिप्त, असा दाखविलेला नसून चांगला शहाणा, चतुर व पंडित आहे व त्याचा विनोद केवळ त्याच्या चातुर्याचा व पांडित्याचाच एक भाग आहे असें भासविण्यांत आलें आहे. पण त्यामुळेंच त्याचें प्रत्येक विनोदात्मक वाक्य त्याला वात्रट व फाजील ठरविण्यास कारण झालें आहे. वनमाला रहात असलेल्या घरावर दरवडा पडला असतां ‘ विनोदा ’नें केलेला फाजीलपणा त्याच्या फाजीलपणाचा कळसच झाला आहे. तो स्वतःची शेंडी एका हातानें ओढीत येतो आणि “ अहो धांवा, धांवा, आमच्या घरांत चोर शिरले आहेत आणि माझी शेंडी धरून मला ओढीत नेत आहेत: धांवा,

धांवा, कोणी तरी मला सोडवा." असें ह्मणत निघून जातो. ( पृ० ४३ ). या त्याच्या वर्तनांत थोडा तरी स्वाभाविकपणा आहे काय ? विक्षिप्त मनुष्याचा विक्षिपणाही स्वाभाविक असावा लागतो. पण 'विनोद' हा विक्षिप्त नव्हता व आपली शेंडी आपल्या हातानें ओढून ती चोरांनीं ओढली असें ह्मणणें, ही तर स्वाभाविक गोष्ट नव्हेच नव्हे. शेंडीचा विनोद करणें जर ग्रंथकर्त्याला अवश्यच वाटत होतें, तर त्यानें असें तरी करावयाचें होतें कीं, 'विनोद' घाबरून सैरावैरा वागेंतून पळूं लागला आणि पळतां पळतां त्याची शेंडी एका झुडपांत अडकली आणि त्यामुळें अधिकच घाबरून आपली शेंडी चोरांनीं धरली असें समजून त्यानें आकांत केला ! हो, पण आह्मी विसरलोंच ! तसें ग्रंथकर्त्यानें करविलें असतें तर त्यांत "विनोदा" चें खास चातुर्य कोठें राहिलें असतें ?

**दोष ३ रा.** विलासधर हा आपल्या नाटकप्रसंगांतील मुख्य कळ आहे अशा अर्थाचें नाटककर्त्यानें प्रस्तावनेंत विधान केलें असल्यामुळें तें खोडून काढण्यासाठीं विलासधराच्या स्वरूपाचें आविष्करण पूर्वीच केलें आहे. भामिनीची बहिण अक्कासाहेब हीही या नाटकांतील एक प्रमुख पात्र आहे. हिनें तरी या नाटकांत काय कामगिरी केली आहे ? भामिनीनें श्रीमंत पतीलाच वरावें येवढीच तिची इच्छा होती. ही इच्छा तिजकडून स्वमुखानें बोलविण्यापलीकडे तिचा कोणताच उपयोग या नाटकांत

केलेला नाहीं. पण भाषणें वाढवून पांच अंकांची जागा भरून काढण्या करितां नाटककर्त्यानें तिला व्यर्थ अतिशय तसदी दिली आहे. भामिनीची कुचेष्टा तिच्या मैत्रिणींबरोबर तिनेंही केलेली आहे. तें काम करायला तिच्या ऐवजीं चंपा, मालती, वगैरेंच्या सोबतीस एखादी 'चमेली' दिली असती तर सहज भागलें असतें. विलासधर व अक्कासाहेब यांचा रंगमहालांतील हिडिस संवाद कशाला पाहिजे होता ? त्या उभयतांनीं मिळून मोठा थोरला व्यूह रचिला तो कोणता, तर अक्कासाहेबांनीं जाऊन बाबासाहेबांकडे असा 'हट्ट' धरावयाचा कीं त्यांनीं भामिनीला पंचवीस लाखांच्या जहागीरदारांशिवाय दुसऱ्या कोणासही देऊं नये! (पृ० ५९) बाबासाहेबांना भामिनी कितीशी जुमानीत होती हें पुनः सांगण्याचें कारणच नाहीं. बरें, अक्कासाहेबांनीं तसा 'हट्ट' तरी धरला काय ? मुळींच नाहीं. तिला हट्ट धरावयास जाण्याची सवड होण्यापूर्वींच धैर्यधराला पंचवीस लाखांची जहागीर रा. खाडिलकरांनीं देऊन टाकिली ! तेव्हां अक्कासाहेब ह्मणाल्या [ पृ० ६७ ) "आतां भामिनीनें खुशाल धैर्यधरजीशीं लग्न करावें. नवरा मुलगा लग्नाच्या वेळेला श्रीमंत असला ह्मणजे आह्मां बायकांचें समाधान होतें." खुळी कुठली ! आणि तो नवरा मुलगा विलासधराप्रमाणें अक्कलशून्य असला तरी देखील समाधानच होत असेल, नाहीं ?

**दोष ४ था.** कुसुम ही भामिनीची मैत्रीण होय.

ही काहीं तिची मोलकरीण खास नव्हती. असें असतां ही भामिनीबरोबर भटकत कशी फिरते? तिला बाप दादा वगैरे कोणीच नव्हते काय? भामिनी एक धैर्य-धराच्या पाठीस लागलेली होती. तेव्हां तिला सगळ्या गोष्टी माफ! पण कुसुमनें भामिनीबरोबर आपलें घरदार लाजलज्जा सोडून आपलें नांव पालटण्यास व धैर्यधराची सेवाचाकरी करून राहण्यास कबूल व्हावें हें किती विपरीत? त्या काळीं हिंदु स्त्रिया इतक्या स्वतंत्र झाल्या होत्या कीं काय? लढाईवर गेलेल्या धैर्यधराच्या सेनातील बायकांची जरूरी होती काय? त्याच्या लष्करा-बरोबर कितीशा धिंडका फिरत होत्या? खुद्द धैर्य-धराच्या तंबूंत ह्या दोघी त्याला गांठ पडण्यापूर्वीं आणखी किती रखेल्या होत्या? तशी कांहीं व्यवस्था असल्याचें तर दिसत नाहीं. मग भामिनी व कुसुम ह्या त्याजकडे नोकरी मागण्यास गेल्या कशा? व लष्कराला शिस्त लावण्याची ज्याचेवर जबाबदारी त्या धैर्यधर सेनापतीनें त्या तरुण व सुंदर पोरींना नोकरीस ठेवून तरी कसें घेतलें? बरें, भामिनीला इतका द्राविडी प्राणायाम करण्याची तरी काय जरूरी होती? धैर्य-धराचें तिजवर चोरीच्या व चकमकीच्या अंधुक चांदण्या रात्रींच प्रेम जडलें नव्हतें काय? मग तिला त्याच्या नोकरीसच ठेवण्याची ग्रंथकर्त्याला कां आवश्यकता वाटावी? प्रेमपात्रांच्या द्वारेंही त्याला त्यांचें लग्न किती तरी सुलभ रीतीनें जुळवितां आलें असतें; अथवा

तिजकडून तिच्याच नांवानें केसरींत एखादी लग्नाची जाहिरात देवविली असती तरी चाललें असतें ! आमच्या धैर्यधरजींचा अर्ज तिच्या पायावर पहिल्या सपाट्यालाच येऊन पडला असता यांत संशय कशाचा ? आमचा सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं भामिनीनें व विशेषतः कुसुमनें धैर्यधराजवळ जाऊन राहणें हें कोणत्याही दृष्टीनें आवश्यक, स्वाभाविक, व योग्य नव्हतें.

**दोष ९ वा.**—श्रीमंत लोकांना आपल्या श्रीमंतीचा किती ताठा असतो व धनमदानें ते गरीबांची कशी अवहेलना करीत असतात, हें दाखवून त्यांची कान-उघाडणी करण्याचा प्रस्तुत नाटकाचा वास्तविक उद्देश होय व तो उद्देश सिद्धीस नेण्यासाठीं जीं श्रीमंत पात्रें नाटककर्त्यांनें योजिलीं आहेत त्यांत लक्ष्मीधर हें एक विशेष प्रमुख पात्र होय. परंतु त्या योजनेप्रमाणें ह्या पात्राची उठावणी करण्यांत नाटककर्ते सपशेल घसरले आहेत. लक्ष्मीधर हा एक मूर्ख मनुष्य दाखविला असून दागदागिन्यांनीं नटण्याची त्याची हौस फारच प्रबल होती इतकाच त्याच्या चरित्रापासून बोध निघतो. नटण्याची हौस गरीबांना नसते असें नाहीं व ते मूर्ख नसतात असेंही नाहीं. त्यांचें नटणें त्यांच्या गरीबीमुळें बेताचे असतें व श्रीमंतांचें थाटाचें असतें. श्रीमंतांनीं हातांत सलकडी घातलीं, बोटांत आंगठ्या घातल्या, किंवा कानांत भिकबाळ्या घातल्या, तर गरीब निदान शक्य तितका सुंदर पोषाख करण्याची तरी धडपड

करतातच. गरीबानें काय किंवा श्रीमंतानें काय मर्यादेच्या बाहेर थाटमाट केला तर तो त्यास शोभावयाचा नाहीं. नटण्याचा दुर्गुण श्रीमंतांमध्यें विशेष विकोपास गेलेला आहे असेंही आह्मांस वाटत नाहीं. खरेंच पाहूं गेलें, तर श्रीमंतांपेक्षां गरीबांमध्येंच नटणें जास्त आढळून येईल. मुंबई हें लक्ष्मीचें माहेर घर ना? तेथें लक्षाधीश, कोट्याधीशही आहेत. पण दागदागिन्यांनीं आपलें शरीर मढवून घेणारे पुरुष तेथें कोणाच्या दृष्टीस तरी पडतात काय? तोच प्रकार इतर सर्व ठिंकाणींही आहे. मूर्खपणासंबंधानें विचार केला तरी श्रीमंत लोक गरीबापेक्षां जास्त मूर्ख असतात किंवा त्यांच्यामध्यें मूर्खांचें प्रमाण जास्त असतें असेंही खात्रीनें ह्मणतां येणार नाहीं. तेव्हां लक्ष्मीधर हें पात्र केवळ मूर्ख व नटणारें दाखविल्यानें श्रीमंतांचें चित्र डोळ्यापुढें येणें शक्य आहे काय? श्रीमंतांचा सामान्य दोष ह्मटला ह्मणजे त्यांना असलेला श्रीमंतीचा ताठा व गरीबांना नेहमीं तुच्छ लेखण्याचा त्यांचा प्रघात. त्यांच्या ह्या दुर्गुणाचें आविष्करण प्रस्तुत नाटकांत विशेष ठळक रीतीनें व प्रामुख्यानें होणें अगदीं जरूर होतें. पण लक्ष्मीधराला मूर्ख बनविल्यामुळें त्याच्या तोंडचे शब्द ह्मणजे निव्वळ वायफळ वल्गनाच दिसतात. ''खरा श्रीमंत' मनुष्य जर एखाद्या गुणी गरीबाचा कोणत्याही कारणानें द्वेष करण्यास उद्युक्त होईल, तर तो आपल्या संपत्तीच्या बळावर त्याचा पुरा पिच्छा पुर-

विल्यावांचून कदापि रहावयाचा नाहीं. तो गुण लक्ष्मीधराच्या आगीं नसल्यामुळें तो ' खरा श्रीमंत ' च नव्हे असें ह्मटलें पाहिजे. त्याचप्रमाणें तो ' खरा मूर्ख ' ही नाहीं. खरा मूर्ख झाला तरी तो सुप्रसंगींच मूर्खपणा करितो ! मूर्खाला सुद्धां मनुष्यस्वभाव असतोच! शहाण्यापेक्षां मूर्खाला आपल्या शहाणपणाची घमेंड फार असते. आपणाला सर्व कांहीं समजतें असा त्याला गर्व असतो. पण तो शहाणपणाची ह्मणून जी गोष्ट करतो किंवा बोलतो त्यांतच त्याचा मूर्खपणा व्यक्त होत असतो. मूर्खाच्या स्वभावांतील हे सर्व गुण-र्म लक्ष्मीधराच्या चरित्रांत दिसत नसूनही त्याला बडा मूर्ख ह्मणण्यावांचून कोणाला गत्यंतर राहूं नये अशी त्याचें चित्र रेखाटतांना नाटककर्त्यानें खुबी केली आहे. विलासधर लक्ष्मीधराला शूरपणाची तालीम देत असतां ( अंक २ रा ) लक्ष्मीधर खरोखरच घाबरला असें जें दाखविलें आहे, तें किती बरें अस्वाभाविक आहे ? विलासधर चोराचें सोंग घेऊन जाणार आणि भामिनीच्या आंगावर ओरडणार; त्यावेळीं लक्ष्मीधरानें त्या चोरावर तरवार उपसून कसें धांवावयाचें, याची तालीम चालली असतां:—

**लक्ष्मी०**—ठीक आहे, दाखवितों, तुह्मीं भामिनीच्या अंगावर तुटून पडल्यासारखें दाखवा.

**विला०**—बरें आहे, भामिनीला मी धरली आहे असें समजा, आतां दरडावून बोलतों कीं लगेच तुह्मी तलवार

उपसा.–ए मुलीनों, एकूण एक दागिना काढून द्या, नाहीं तर प्राणास मुकाल.

लक्ष्मी०–( कांपत ) सगळे दागिने आह्मी देतों, पण आमचे प्राण घेऊं नका, सगळे दागिने घ्या, अंगावरचे घ्या, पेटींतले घ्या–" आतां खरें ह्मटलें तर हा प्रसंग लक्ष्मीधराची बोबडी वळण्याचा कीं त्याच्या शूरत्वाला भरतें येण्याचा याचा वाचकांनींच निर्णय करावा. लोकांना हंसवायालाच पाहिजे होतें तर त्या प्रसंगीं लक्ष्मीधरानें मोठ्या शूराचा आव घालून 'हा दुष्टा, भरतकुलाधमा' इत्यादि गर्जना करीत विलासधरावर तुटून पडून त्याच्या गळ्यावर तरवार ठेवावयाची होती व विलासधरानें 'हा मूर्ख खरोखरीच आपणांस जखमबिखम करील' ह्मणून घाबरावयाचें होतें. तसें केलें असतें तर लक्ष्मीधराच्या मूर्खपणाला बट्टा न लागतां, किंवा तो अस्वभाविक न दिसतां, हवें तितकें हंसें पिकलें नसतें काय? लक्ष्मीधरानें गर्भगाळित होण्याचा खरा प्रसंग ह्मटला ह्मणजे ते उभयतां भामिनीवर आपल्या कपटनाटकाचा प्रयोग प्रत्यक्ष करावयास गेले तेव्हांचा होय. पण त्या वेळींहीं लक्ष्मीधर अस्वाभाविकपणेंच वागतो! विलासधर दाढी लावून घेतलेला असा एके बाजून येतो व हातीं तलवार घेतलेला लक्ष्मीधर दुसऱ्या बाजूनें येतो. तो दाढीवाला विलासधरच आहे कीं खरोखरीचा चोर आहे या शंकेनें लक्ष्मीधर 'मनांत' घाबरला असें दाखविलें आहे तें स्वाभाविक आहे

खरें, पण त्या शंकेचें निवारण करण्याकरितां लक्ष्मीधरानें "अहो, तुह्मी खरोखरच चोर आहांत कां चोरांचें सोंग आणलें आहे ?" असा जो थट्टेबाज प्रश्न त्याला 'उघड' विचारला आहे तो त्याच्या भित्रेपणाला मुळींच शोभणारा नाहीं. पुढें विलासधर भामिनीला दरडावतो व लक्ष्मीधराला खुणावतो. त्यावेळीं 'लक्ष्मीधर कांपत उभा राहतो' असें नाटककर्त्यानें कंसांत सांगितलें आहे. पण इतक्यांत खरोखरीचे चोर आले ! शिकवून पढवून तयार करून नेलेला लक्ष्मीधर विलासधराच्या नुसत्या चोराच्या बतावणीला जर इतका कांपतो तर खरोखरीचे पांचदहा सशस्त्र चोर पाहून वास्तविक पाहतां लक्ष्मीधरानें मूर्च्छित होऊनच पडावयास पाहिजे होतें. पण आमचे नाटककार पडले विनोदी. विनोद करण्याचें त्यांना स्फुरण चढलें कीं ते कोणाच्या तोंडीं केव्हां कोणता विनोद घालतील याचा सुमारच नाहीं. लक्ष्मीधराला पाहून एक चोर ह्मणाला "अरे वा, दागिन्यांनीं कसा फुलला आहे !" दुसरा चोर ह्मणाला "शेपन्नास बायकांना लुटलें असतांना जितके दागिने मिळणार नाहींत, तितके दागिने ह्या गुलामाच्या अंगावर आहेत !" त्यावर लक्ष्मीधरजी ह्मणतात "शेंपन्नास कां ? आमच्या गांवांतील सगळ्या बायकांना पुरून उरतील इतके दागिने माझ्या एकट्याच्या अंगावर आहेत." !!! कां ? कसें आहे आमच्या नाटककर्त्याचें स्वभावचित्र रेखाटण्याचें कौशल्य ? त्याच्या

चतुराईचें वर्णन जेवढें करावें तेवढें थोडेंच आहे. बराच वेळपर्यंत, चोरांचे विलासधराकडे ( तो भामिनी जवळ उभा असतां ) लक्ष जात नाहीं, हा पहिला चमत्कार; आणि इतकी सवड असतां तो ( निःशस्त्र ! ) विलासधर पळून जाण्याचा प्रयत्न करीत नाहीं हा त्याहून मोठा चमत्कार. तसेंच—पण नको, हे चमत्कार संपावयाचेच नाहींत ! ते कोठले ह्मणून सांगावेत आणि कोठले सोडावेत ? संबंध नाटकच चमत्कारिक आहे, मग चमत्कारांना काय तोटा ? असो. आपण लक्ष्मीधरा संबंधानें बोलत होतों. सदर दरोड्याच्या प्रसंगींच त्याचें वर्तन व भाषण अस्वभाविक होतें असें नाहीं. अथ पासून इतिपर्यंत लक्ष्मीधर ह्मणजे मूर्तिमंत अस्वाभाविकपणाचा पुतळाच बनविण्यांत आला आहे. त्यासंबंधीं एकच उदाहरण देऊन लक्ष्मीधराला आपण केराच्या टोपलींत फेंकून देऊं. [ पृ० ६३ पहा. ]

**लक्ष्मी**०—विनोदा, यांच्या अंगावर माझ्याहून अधिक दागिने दिसतात काय ? माझ्या नाकांत नथ नाहीं त्यामुळें कमीपणा दिसत असेल (!) असा ओका चेहरा भामिनीला कसा दाखवूं ? ( !! ) काय बायका आप्पलपोट्या पहा; ह्यांनीं तेवढ्या नथा नाकांत घालायच्या, आणि आह्मी पुरुषांनी मात्र नाक टोंचायचें नाही. ( !!! ) माझें मत आहे, ( ! ) ही रूढी पायांखाली तुडवून ( !! ) पुरुषांनी दोनही नाकपुड्या टोंचाव्या; ( !!! ) एरवीं बायकांवर ताण व्हावयाची

नाहीं. (!) पुरुषी थाटाच्या नथा (!!) घालण्याची सुधारणा अमलांत आणलीच पाहिजे. (!!!) आम्ही बायकांसारखे केंस नाहीं का ठेवीत, तिरपा भांग नाहीं का काढीत ? (!!!!) मग नथेनेंच काय केलें आहे ? (!!!!!)

लक्ष्मीधर हा स्त्री नव्हता, व 'तूं पुरुष आहेस' असें त्याच्या मनांत कोणीं तरी भरवून दिलेलें होतें; असें त्याच्या वरील भाषणावरून स्पष्ट ठरतें.

**दोष ८ वा.** कुसुमच्या बागेंत भामिनी धैर्यधराची शिकार करण्यासाठीं राहिली असतां, रात्रींच्या अवेळीं त्याची व तिची प्रथम गांठ पडते. ती कोण, काय याची चौकशी करण्याला धैर्यधरानें शीलधराला सांगितलें असतां त्यानें तिला एकदम पुष्कळ प्रश्न विचारले- असें वाटून [ पृ० ३६ ]

**धैर्य०**—शीलधरा, किती प्रश्न एकदम विचारतोस ? चोरांच्या व मेघांच्या भीतीनें ही भ्यालेली दिसते, आणि त्यांत तुझ्या प्रश्नांचा हा भडिमार ! भिण्याचें कारण नाहीं; मन मोकळें करून आपली हकीगत सांगा.

भामिनी कांहीं वाट चुकून आडरानांत आलेली नव्हती. तर चोरांना व मेघांना भिऊन ती हळूच घराचें दार उघडून बाहेर मैदानांत येऊन उभी राहिली होती ! इतकी ती चतुर! व आपणांस पाहून तिनें घरांत जाऊन दार लावून घेण्याचाही यत्न केलेला नसतां, ती भ्यालेली दिसते असा तर्क करणारा धैर्यधर तर तिच्यापेक्षांही

चतुर! धैर्यधराच्या पहिल्याच प्रश्नाला भामिनी उत्तर कसें देते पहाः—

भामिनी—महाराज, थोड्या वेळापूर्वी पावसाची भीति होती; पण आतां आपण आल्याबरोबर ते मेघही मार्गे परतले! सर्व सेनेचे मुख्य धैर्यधरजी येथें असतांना चोरांची भीति कोणाला वाटणार आहे? बाकी चोरांच्या भीतीचा लवलेशही माझ्या मनाला येथें कधींच शिवला नाहीं; आमच्या ह्या घरांत एक फुटकी कवडी देखील चोरांना मिळावयाची नाहीं.

भामिनीच्या या येवढ्याशा भाषणांत किती तरी दोष व दोषबीजें भरलेलीं आहेत! भामिनीनें आपल्या बापाच्या घरीं धैर्यधराचा जाणूनबुजून अपमान केलेला होता. तसा अपमान केल्याबद्दल तिला खेद उत्पन्न झाल्याचा, तिचें त्याजवर प्रेम बसून तें अनावर झाल्याचा, किंवा तिचा त्याच्याशीं सलगीनें बोलण्या इतका परिचय झाल्याचा कोणताच प्रसंग त्यापूर्वीं नाटकांत दाखविलेला नाहीं. धैर्यधराच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकून त्याचा 'पराक्रम' तिच्या मनांत भरूं लागल्याचा उल्लेख मात्र विलासधर व विनोद यांच्या भाषणांत येऊन गेलेला आहे. पण तिरस्काराच्या दरींतून ती प्रेमाच्या शिखरावर कशी कशी चढत गेली हें दाखविण्याला तेवढा उल्लेख निखालस कुचकामाचा आहे. जिनें अत्यंत उद्धटपणानें धैर्यधराचा अपमान केला, ती आधीं बापाच्या सांगण्यावरून कां होईना, धैर्यधराच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकण्या-

१०४८८

साठीं 'रणांगणाशेजारच्या कुसुमच्या बागेंत' जाऊन राहण्यास कशी कबूल झाली हेंही मोठें गूढच आहे. बरें नुसत्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकून तिचें त्याजवर प्रेम जडणें कितीसें शक्य आहे? त्याचें तिला एकवार तरी दर्शन होण्याची कांहींच जरूरी नव्हती काय? आथेल्लो-वर डेसडेमोनेचें प्रेम त्याच्या काळ्याकुळकुळीत रंगामुळें न बसतां त्याच्या पराक्रमादि गुणांमुळेंच बसलें होतें, हें खरें. तथापि त्या नाटकाचा आरंभ उभयतांचें एक-मेकांवर प्रेम बसलें आहे येथपासूनच झाला असून, तें कसें बसलें याचा स्पष्ट व स्वाभाविक खुलासा देण्याची शेक्सपियरनें पूर्ण खबरदारी घेतली आहे. डेसडेमोनेनें आथेल्लोचा कृष्णवर्ण अनेकदां पाहिलेला होता व त्या कृष्णवर्णांत झळकणारें वीरश्रीचें तेज व त्यानें भोग-लेल्या संकटांचीं वर्णनें ऐकून तिच्या हृदयांत त्याच्या विषयीं उत्पन्न झालेली सहानुभूति यांच्यामुळें तिच्या ठिकाणीं प्रेमाचा उदय होऊन त्याचा विकास होत गेला. पण आमची भामिनी धैर्यधराचा हलकटपणानें उपमर्द करून जी उड्डाण मारते ती एकदम कुसुमच्या बागेंत उतरून वर दिलेलें भाषण पहिल्याच भेटीला धैर्यधराशीं करते! काय ह्मणते, "आपण आल्याबरोबर ते मेघही मागें परतले! सर्व सेनेचे मुख्य सेनापति येथें असतांना चोरांची भीत कोणाला वाटणार आहे?" किती हा धीटपणा, किती हा लुब्रेपणा! तिचें हें अप्रा-संगिक खुषमस्करीपणाचें भाषण ऐकतांच ही कदा-

चित् आतां आपला हात धरून आपणास घरांत ओढून नेऊं लागेल अशा शंकेनें धैर्यधरानें तिच्या कमरेंत एक सडकून लाथ घातली असती, तर आमचें फार फार समाधान झालें असतें. पण दोघेंही तसलींच ! ती आपल्याच तोंडानें सांगते कीं ' आमच्या ह्या घरांत फुटकी कवडी देखील चोरांना मिळावयाची नाहीं. ' मग ही धडकी कवडी काय राखायाला जागत राहिली होती ? पुढें तो खुळा धैर्यधर तिच्या स्वरूपास लुब्ध होऊन मोठ्या मिनतवारीनें तिला ' तूं पहारा करण्याचें श्रम घेऊं नकोस ' असें सांगत असतां ती ह्मणते ' मी थोडावेळ पहारा केला ह्मणून त्यांत काय बिघडलें ? ' पुनः जातांना धैर्यधरानें ह्मटलें " वनमाले, ( धैर्यधरही किती लवकर तिचेशीं सलगीनें बोलूं लागला पहा ! ) तुझा हट्टच असला तर पहारा कर; पण तूं घरांत जाऊन बंदोबस्तानें रहावेंस, हें उचित दिसतें. " एकूण तिनें घरांत जाऊन बसणें हेंच विशेष बंदोबस्ताचें होतें हें धैर्यधरालाही समजलें तर ! पण त्या भामिनीला व रा. खाडिलकरांना धैर्यधराचें ह्मणणें साफ पटलें नाहीं ! त्या घरांत राखण्यासारखी वस्तु ह्मटली ह्मणजे काय ती भामिनी हीच होती; आणि तिलाच आणून नाटककर्त्यानें बाहेर उभी केली ! तेथून ती कांहीं केल्या पुनः कांहीं आंत जाईना ! कोणीं तरी घटिंगणांनीं येऊन तिला उचलून न्यावें असा तर तिचा व नाटककर्त्याचा दृढ संकल्प नव्हता ना ? तसें नसेल, तर धैर्यधर वरच्या

प्रमाणें सांगून गेल्यानंतर सुद्धां भामिनी कोणत्या सबबी-वर-कशासाठीं ह्मणून-बाहेरच राहिली ?

दोष ७ वा—भामिनीला शूर बनविण्याची काय जरूर होती ? तिला वनमाला नांव देण्याचें तरी काय प्रयोजन होतें ? ती अवचित चोरांच्या तावडींत सांपडली व धैर्यधरानें येऊन तिला त्यांच्या हातून सोडविलें, व त्यामुळें भामिनी उपकारबद्ध होऊन तिला तसल्या पुरुषाचा अपमान केल्याबद्दल वाईट वाटूं लागलें, व धैर्यधरानें अपमान विसरूनही आपलें रक्षण केलें, याबद्दल तिला त्याच्याबद्दल आदर वाटूं लागला, असें दाखविलें असतें तर तें अधिक रमणीय झालें नसतें काय ?

दोष ८ वा—भामिनी अलंकारांशिवाय कुसुमच्या बागेंत जाऊन राहिली होती हें विलासधरास माहीत नव्हतें काय ? बरें, चोराचे वेषानें तो तिजवर जेव्हां धांवून गेला तेव्हांही तिच्या अंगावर दागिने नाहींत हें त्याला दिसलें नाहीं काय ? पण ( पृ. ४२ ) विलासधर तिला ह्मणतो " ए मुली, एकूनएक दागिना मुकाट्यानें दिला पाहिजे !!! " खरोखरीचे चोर आले, त्यांना मात्र तिच्या अंगावर कांहीं दागिने दिसले नाहींत. एक चोर ह्मणतो " आह्मी ह्या मुलीपाशीं कांहीं आहे का तपासतों " त्या तपासांत त्यांच्या हातीं कांहीं लागलें नाहीं हें सांगावयास नकोच. पुढें ( पृ० ४४ ) भामिनी, विलासधर व लक्ष्मीधर यांस ह्मणते कीं, " तुह्मीं मला चोरून न्यायला आलां होतां " आणि

लक्ष्मीधर ती गोष्ट कबूल करतो. तिची तशी समजूत होणें साहजिक आहे व विलासधराला 'खुनशी' बनविण्याचें जर नाटककर्त्याच्या मनांत होतें तर तिचें धैर्यधराबरोबरचें लग्न मोडण्याकरितां विलासधराकडून तिला खरोखरीच पळवून नेवविलें असतें तर किती नामी झालें असतें !

**दोष ९ वा**—नाटकाच्या प्रारंभालाच भामिनी असें ह्मणते कीं "धैर्यधरजी पराक्रमी झाले, सेनापति झाले, तरी बाबांच्यापेक्षां गरीबच ना ? नुसत्या पराक्रमावर बायकांचें मनच बसत नाहीं. मनाची हौस भागेल इतके दागिने घालणारा नवरा बायकांना आवडतो" असें तिचें वेडगळ पण निश्चित मत असतांना तिची वडील बहिण, मैत्रिणी व 'विनोद' हीं सर्वचजणें तिची कुचेष्टा कशासाठीं करतात ? त्यांचेंही मत तिनें धैर्यधराला वरूं नये असेंच होतें. जर तिचा बेत धैर्यधराबरोबर लग्न लावण्याचा असता, तर तिचें मन पालटण्यासाठीं तिजवर इतक्या जणांनीं केलेला हल्ला शोभला असता. पण वस्तुस्थिति वर सांगितल्याप्रमाणें असल्यामुळें नाटकारंभींचा महिषासुरमर्दिनीच्या देवालयांतील त्या सर्व मंडळीचा प्रवेश केवळ डोळ्यांना थक्क करण्यापुरताच असून त्या मंडळींचीं भाषणें कोठूनही अंकाची भरती करण्यासाठींच खरडलेलीं आहेत असें दिसतें.

**दोष १० वा**—( पृ० ४७ ) भामिनीचें प्रेमावरील आत्मगत भाषण व्याख्यानाच्या स्वरूपाचें आहे. तसें

व्याख्यान देण्याइतका तिच्या प्रेमाचा प्रवाह विस्तृत झालेला नाहीं. धैर्यधराशीं तिचा संवाद होऊन तिच्या ठिकाणीं नुकता कोठें प्रेमाचा उद्भव झालेला आहे. प्रेमाची तिडिक किती प्रबळ व शास्वत असते याचा अनुभव मिळण्याला कांहीं जास्त काळ लोटावयास पाहिजे होता. प्रेमाच्या वस्तूच्या विरहानें तिला तळमळ लागावयास पाहिजे होती. आणि अशा वेळीं तिचें प्रेम विकत घेण्याचा कोणी जर प्रयत्न केला असता आणि मग " प्रेम ही विक्रीची वस्तु नव्हे; पूर्वीं मी माझें प्रेम विकायाला बसलें होतें; पण त्यावेळीं मला प्रेमाची ओळखच नव्हती; आतां मला खरें प्रेम ह्मणजे काय याचा अनुभव आला आहे. आतां मला माझ्या प्रेमा-साठीं दागिन्यांची, पंचवीस लाखांची किंवा जहागिरींची किंमत नको इतकेंच नव्हें तर माझ्या प्रेमाची वस्तु मला मिळण्यासाठीं मी माझें सर्वस्वही अर्पण करीन. माझा प्रियकर गरीब असो, त्याच्या संगतीनें माझे कितीही हाल होवोत, पण मला माझ्या प्रियकराच्या प्राप्तीशिवाय जगांतील दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा लोभ वाटत नाहीं " अशाप्रकारचे स्वतःच्या अनुभवाचे अंतःकरणांतील उद्गार तिनें प्रगट केले असते, तर ते अगदीं यथार्थ व प्रसंगास अनुरूप असे दिसले असते. पण वर निर्दिष्ट केलेल्या ठिकाणीं तसा योग्य प्रसंग नाहीं. व भामिनीचें भाषण पहावें तर तें दिलें आहे बहुतेक व्याख्यानाच्या स्वरूपांत ! " बाजारी जिन्नस

नेहमीं नकली असावयाचा....खऱ्या दयेला आणि खऱ्या प्रेमाला केव्हांही मोबदल्याची जरूरी नसते; कारण दया आणि प्रेम ह्मणजे सुखाचा झरा. त्याच्या पलीकडे आनंदाची पायरीच शिल्लक राहत नाहीं. मग प्रेमी जिवाला कोणचा लोभ शिल्लक राहणार आणि मोबदला तरी तो कसचा मागणार ? " हीं भामिनीचीं विधानें सिद्धांतपर असून, तसे सिद्धांत तिच्या तोंडीं घालण्याइतका तिला प्रेमाच्या स्वराज्याचा उपभोग घ्यावयास अद्याप मिळालेलाच नव्हता. ए. बी. सी. डी. पर्यंतही ज्याची गति झालेली नाहीं त्यानें एकदम इंग्रजी वाङ्मयाची तारीफ करीत सुटणें जसें चमत्कारीक दिसेल तसेंच जिचा प्रेमाच्या राज्यांत नुक्ता कोठें प्रवेश होऊं लागला आहे तिनें प्रेम ह्मणजे सुखाचा झरा व त्याच्या पलीकडे आनंदाची पायरीच शिल्लक राहत नाहीं, असें ह्मणणें हेंही चमत्कारिकच होय.

दोष ११ वा—बागेंत दरोडा आल्यावेळीं दरोडेखोरांबरोबर चकमक होऊन त्यांच्या मुसक्या बांधण्यांत आल्या. ह्या मुसक्या बांधण्याला त्या ठिकाणी चौकीदार हजर होते. धैर्यधरानें शीलधराला चोरांना चौकीवर घेऊन जाण्यास सांगितलें. त्या वेळीं झाडाला बांधुन घातलेला लक्ष्मीधर आपल्या अस्वाभाविक स्वभावाप्रमाणें 'न्या भागूबाईना, कशी खोड मोडली गुलामांची' असें बोलला. त्याचें बोलणें ऐकून धैर्यधराचें त्याच्याकडे व विलासधराकडे लक्ष गेलें. तेव्हां (पृ० ४४)"....वन-

झाले, हे फार मोठे गृहस्थ आहेत, लक्ष्मीपुत्र म्हणून नांवाजलेले आहेत, यांना बंदोबस्तानेंच यांच्या तंबूकडे पाठविलें पाहिजे. यांच्या बरोबर द्यायला कांहीं पहारेकरी घेऊन येतों, तोंपर्यंत तूं यांना बंधमुक्त कर." असें म्हणून धैर्यधर निघून गेला! त्याच्या पश्चात् भामिनी व ते दोघे यांचें भाषण व्हावयाला पाहिजे होतें, येव-ढ्याचसाठीं धैर्यधराला भलत्याच सबबीवर जायाला लाविलें आहे, असें येथें म्हणावें लागतें. कारण ते दोघे श्रीमंत असले तरी आतां त्यांच्या आंगावर कोण-ताही दागिना राहिलेला नव्हता. मग त्यांना बंदोबस्तानें पाठविण्यासाठीं पहारेकरी कशाला पाहिजे होते? बरें, त्यांना बोलावून आणावयाला तंगड्या तोडत प्रत्यक्ष 'मुख्य सेनापती'नें जावें हें किती हास्यास्पद? चोरांना घेऊन सगळेच चौकीदार कशाला जायाला पाहिजे हो ते? सेनापति साहेबांची इभ्रत सांभाळण्यासाठीं एखादा तरी सेवक नाटककर्त्यानें त्याच्याजवळ शिल्लक ठेवावयाचा होता. कदाचित् तो 'दरिद्री' सेनापति असल्यामुळें त्याच्याकडे जास्त लोक त्या प्रसंगीं नव्हते असें गृहीत धरलें, तरी धैर्यधरानें घटकाभर थांबावयाचें होतें; म्हणजे चोरांना पोंचवून शीलधर पुनः त्याजकडे आला असता. बरें धैर्यधराला पहारेकरी पाहिजे होते ते त्या दोघांना कैदी करून नेण्यासाठीं पाहिजे होते असेंही नाहीं. कारण जातांना तोच भामिनीला त्यांना बंधमुक्त करावयास सांगून गेला आहे. मग त्यांना बंदोबस्तांत पाठविण्याची धैर्य-

यादींतून त्यां दोघांचीं नांवें कमी करून तुझें नांव त्यांच्या जागीं घालावें; आणि चोरांनीं लुटलेले हे दागिने सरकारांत जप्त करून पृथ्वीधर महाराजांच्या हस्तें तुला बक्षीस द्यावेत. पहा हे दागिने, हे तुला आवडतात का? चांगले मौल्यवान् आहेत. पाहण्यासारखें जडजवाहीर जर कोठें असेल तर तें 'लक्ष्मीधरजीं' ध्याच घरीं अशी ख्याति आहे; आणि मला वाटतें, त्या भित्र्यानें आज निवडकच जवाहीर अंगावर घातलें होतें. पहा, खरोखर हे दागिने पाहण्यासारखे आहेत. वनमाले, सेनापति या नात्यानें हे दागिने जप्त करण्याचा व त्यांची पाहिजे तशी विल्हेवाट लावण्याचा अधिकार मला आहे. वन-माले, तुझ्या आजच्या शौर्याबद्दल हे दागिने पृथ्वीधर महाराजांच्या हस्तें बक्षीस देण्याचें तितकें कांहीं कारण नाहीं; मीच तुला बक्षीस देतों." ते दागिने कितीही मौल्यवान् असले, भामनाला किंवा दुसऱ्या कोणत्याही भवानीला ते कितीही आवडणारे असले, ते दागिने पाहून धैर्यधराची कितीही लाळ जरी गळत असली, आाण भामिनीला ते देऊन टाकण्याची त्याची कितीही इच्छा असली, तरी चोरांपासून सोडवून आणलेले दागिने जप्त करून त्यांची पाहिजे तशी विल्हेवाट लावण्याचा अधिकार सेनापतीला पोंचतो हें ह्मणणें कोणीही कबूल करणार नाहीं. लष्करी शिस्तीविरुद्ध लक्ष्मीधर व विलास-धर यांजकडून जर कोणतेंही वर्तन झालें असेल, तर त्यांची चौकशी करण्यास धैर्यधर मुखत्यार होता. आणि

चोकशी अंतीं त्यानें जरी त्यांचे दागिने जप्त करण्याचा हुकुम केला असता, तरी ते दागिने सरकारजमाच व्हावयास पाहिजेत. त्याला स्वतःला ते गिळंकृत करायाला किंवा आपल्या प्रीतिपात्राला अर्पण करून टाकायाला यावयाचे नाहींत ! बरें, लष्करी शिस्त ठेवण्यांत आमचे सेनापतिसाहेब मोठे कडक होते ह्मणावें तर तसेंही नाहीं. स्वतः धैर्यधरच ह्मणतो " असले प्रकार लष्करांत उपयोगी नाहींत ह्मणून मी कितीदां तरी ताकीद दिली आहे " ! बापड्यांच्या ताकीदीला लष्करांत कोणीही जुमानीत नसत, याबद्दल आणखी कोणता पुरावा पाहिजे ? ज्याच्या लष्करांत लक्ष्मीधरासारखे सरदार खपतात, व पुरुष सरदारांची नांवें कमी करून भामिनीला सरदार करून तिला लढाईवर नेण्याची ज्याची तयारी, तो सेनापति खरोखरीच अद्वितीय असला पाहिजे !

दोष १८ वा. धैर्यधरानें अत्यंत कळवळ्यास येऊन अखेरीस ते दागिने भामिनीच्या पदरांत घातले व तिनें ते बाजारी आढेवेढे घेऊन अखेरीस घेतलेही ! पण तिनें त्याबद्दल तीन अटी धैर्यधराकडून प्रथम कबूल करून घेतल्या ! तिची पहिली अट अशी कीं लक्ष्मीधर व विलासधर यांची नांवें सरदारांच्या यादींतून कमी करून त्यांच्या जागीं भामिनीचें नांव घालण्याचा विचार त्यानें रद्द करावा ! त्यांचीं नांवें कमी केल्यानें त्यांना जणों काय मोठी शिक्षाच झाली असती आणि भामिनीचे नांव घातल्यानें तिला जणों काय मोठा मान मिळाला असता !

त्या मानाला भामिनी हपापली नव्हती किंवा लढाईंत जाऊन मरायाला त्या लक्ष्मीपुत्रांची जोडी आतुर झालेली नव्हती! तसेंच खरोखरीच त्यांचीं नांवें कमी करून भामिनीचें नांव सरदारांच्या यादींत घालण्याची दगदग धैर्यधराकडून झालीच असती हें तरी कशावरून? त्यांची तो चौकशी करणार होता, पण तीही त्याजकडून निदान नाटक संपेपर्यंत तरी झालेली नाहीं! भामिनीची दुसरी अट अशी होती कीं लढाईत पडल्यामुळें ज्या पुरुषांचीं कुटुंबें अनाथ झालीं असतील, त्यांना मदत करण्याकडे हे दागिने विकून येईल ती रक्कम खर्च करण्याची तिला परवानगी असावी! भामिनीचा दयाळू व उदार स्वभाव दाखविण्याची किती ही छानदार युक्ति! एकदां ते दागिने भामिनीचे झाल्यावर त्यांचें काय केलेंस ह्मणून धैर्यधर तिला थोडाच विचारायला येणार होता! पण हो! तो आला असता. कारण भामिनीचा असा अंदाज होता कीं त्याचा आपला येनकेन प्रकारेण कधीं ना कधीं विवाह होणारच! आणि तिची तिसरी अट अशी कीं धैर्यधरानें तिच्या मदतीस येऊन तिजवर जे उपकार केले, त्याच्या फेडी दाखल ‘फूल नाहीं फुलाची पाकळी’ ह्मणून तिच्या हातीं आलेली ‘विलासधराचें नांव कोरलेली’ तलवार धैर्यधरानें घ्यावी! ती तलवार त्याला देण्यापेक्षां तिनें खरोखरच बागेंतील एखाद्या फुलाची पाकळी त्याच्या हातावर टाकली असती तर फार चांगलें झालें असतें. ती स्वतः त्या तलवारीनें

रुढली ह्मणून कौतुकानें ती धैर्यधरानेंच मागितली असती आणि मग तिनें ती त्याला दिली असती तर गोष्ट निराळी होती; पण ती मोठ्या दिमाखानें आपण होऊनच ती दुसऱ्याची तलवार त्याला अर्पण करते हें तिचें केवढें मार्दव ! बापड्या विलासधरानें तलवारीवर नुसतें नांवच घातलें होतें, 'ती कोणीही घेऊं नये, घेतल्यास परत करावी ' असेंही—लहान मुलें पुस्तकाच्या मलपृष्ठावर लिहितात त्याप्रमाणें-त्यानें तलवारीवर कोरून ठेवविलें असतें, ह्मणजे त्याची तलवार त्याला खास मिळाली असती ! वरील तीन अटींत काय शोभा आहे हें आह्मांला तरी कळत नाहीं. धैर्यधरानें त्या प्रसंगीं ते दागिने तिला नुसते 'घे' ह्मणणेंही अप्रशस्त होते. स्पष्ट शब्दांनीं उभयतांनींही एकमेकांकडे आपलें प्रेम त्यावेळीं व्यक्त केलेलें नसतां त्यानें दागिने, आणि तेही दुसऱ्याचे, तिला घेण्याबद्दल आग्रह करावा आणि तिने ते घ्यायचे घेऊन आत्मप्रौढीच्या द्योतक अशा अटी घालण्याचा बहाणा करावा हें खचित अत्यंत गर्हणीय होय.

दोष १६ वा—( पृ० ७१ ) काळ्या शालू संबंधाचें भामिनीचें भाषण गरतीला शोभण्यासारखें नाहीं. कुलीन स्त्रियांनीं तें भाषण वाचूं नये व ऐकूं नये.

दोष १७ वा—( पृ० ७२ ) कुसुमनें धैर्यधराच्या गळ्यांत घालावयाची एक फुलांची माळ भामिनीला दाखवून ह्मटलें " पहा ही तुझ्या मनाजोगती झाली

ना ?" तेव्हां भामिनी ह्मणाली, "एवढी मोठी, इतकी ऐटबाज, आणि जरतारांनीं नटविलेली कशाला ग ही माळ आणलीस ? अग, या असल्या माळेचें कसब तुला माहीत नाहीं. प्रियकराला निरोप कळविण्याकरितां असल्या मालेला पाठविलें, आणि मजसारख्या साध्याभोळ्या ( ! ! ! ) मुलींना तोंडघशीं तिनें पाडलें नाहीं, असें आजपर्यंत कधीं झालें आहे का ?—

**सवतचि भासे मला । दूती नसे ही माला ॥ धृ० ॥**
**नच एकांतीं सोडी नाथा, भेटूं न दे हृदयाला ॥ १ ॥**

मला नाहीं आवडत ही माला !" असें ह्मणून तिनें ती माळ खरोखरीच फेंकून दिली ! ! ! काय हा विचार, कीं अविचार, कीं विकार, कीं प्रेमातिशय, कीं गुलाब छकडीचा फार्स ? धैर्यधर कांहीं तिच्या रंगमहालांत यावयास निघाला नव्हता, किंवा तिनें देवीचा प्रसाद ह्मणून हातांत टाकावयाची माळ त्याच्या गळ्यांत घातली तर त्यानें तिला आलिंगन दिलेंच पाहिजे असा शिष्टाचार किंवा 'कुलाचार' असल्याचेंही दिसत नाहीं. फार तर काय पण धैर्यधर भामिनीशीं लग्न लावण्यासच कबूल व्हावयाचा नाहीं, हें कोणालाही कळण्यासारखें होतें. अशा स्थितींत भामिनी त्याच्या आलिंगनसुखाचीच एकदम अपेक्षा करते, तेव्हां तिचा मनोविकार कोणत्या कोटींतील गणावा ? फुलांची माळ हृदयाला भेटावयास देणार नाहीं, ही कविकल्पना कोणत्याही दर्जाची असो, पण त्या धास्तीनें माळ

फेंकून देणारी सुशील कुमारी, नाटकांतील भामिनी-शिवाय दुसरी कोणी खचित यापूर्वी झालेली नाहीं व पुढेंही व्हावयाची नाहीं. लक्ष्मीधराला बेगडी शकार बनविण्याचा, धैर्यधराला कथली दुष्यंत घडविण्याचा, आणि भामिनीला लटकी सुभद्रा रंगविण्याचा बालिश प्रयत्न करून प्राचीन अर्वाचीन सर्व श्रेष्ठ नाटककारांच्या वर अग्रस्थान पटकावण्याचा अत्यंत सुलभ मार्ग तर हा नसेल ना ? कारण दुनया झुकती है. झुकानेवाला निर्माण झाला कीं लागली दुनया डुलावयाला !

**दोष १८ वा**—नाटकांतील पात्रांचे सद्गुण किंवा दुर्गुण दृष्टोत्पत्तीस आणण्याला त्यांजकडून प्रत्यक्ष आचरणच रंगभूमीवर करविलें पाहिजे. एकमेकांच्या गुणांचे एकमेकांनीं वर्णन केलें किंवा त्याहूनही वाईट ह्मणजे ज्याचें वर्णन त्यानेंच केलें आणि प्रत्यक्ष कृति मात्र ‘ पडद्यांत ’ होऊं दिली, तर नाटकाला नाटकच ह्मणतां येणार नाहीं. प्रस्तुत नाटकांत पात्रांचे गुण जिकडे तिकडे निरनिराळ्या पात्रांच्या तोंडच्या व विशेषतः ज्या त्या पात्रांच्या स्वतःच्या तोंडच्या वाक्यांनीं व वर्णनांनींच स्थापित करण्यापलीकडे नाटका-कर्त्यानें तसदी घेतल्याचें फारसें आढळत नाहीं. आणि जेथें आचरण करविलें आहे तेथें तें वर्णिलेल्या गुणांच्या विरुद्धच बहुतकरून आहे. धैर्यधर ह्मणतो, ( पृ० ७४ ) “ महाराजांनीं एकंदर एक कोटीचें उत्पन्न ह्या प्रसंगीं सैन्यांत वांटण्याकरितां काढलें होतें;

चोरीच्या रात्रींच्या प्रसंगानंतर जी स्त्री आपण होऊन आपल्या मार्गें लागून येते व चाकरीच्या मिषानें जगांतील सर्व राण्या, किंवा सरदारणी, किंवा श्रीमंतिणी, किंवा कुटुंबवत्सलांची घराणीं सोडून आपल्यासारख्या सडेसोट पुरुषाबरोबर राहूं इच्छिते, ती कोणी तरी बेमर्यादेची स्त्री असून आपणास आपल्या मोहजालांत अडकविण्याच्याच उद्देशानें आली असली पाहिजे, असाही त्याला तिचा प्रथमारंभींच संशय यावयास पाहिजे होता; परंतु वनमालेसंबंधानें लक्ष्मीधरानें त्याची टवाळकी केली, व वनमाला पूर्वीपासूनच वाईट चालीची होती असे सूचक शब्द उच्चारले, तेव्हां कोठें राजश्रींना तिचेसंबंधानें थोडासा संशय आला, आणि त्यांनीं लक्ष्मीधराला विचारलें 'अहो, तुह्मी वनमालेसंबंधी बोललां, तें खरें कीं काय मला स्पष्ट सांगा !' तेव्हां विलासधर ह्मणाला "अहो, त्यांत काय अर्थ आहे ? किती वनमालेचीं नांवें यांच्या तसल्या यादींत सांपडतील, थांग काय लागणार !" आणि लक्ष्मीधर ह्मणाला "अहो श्रीमंतांचें दर्शन झालें ह्मणजे गरिबांच्या बायकांमुलींचें तसें पाऊल पडायचेंच, त्याची एवढी विचारपूस कशाला ? शिवाय मी आपणाला स्पष्ट सांगतों, माईथा या असल्या ओळखीदेखी थोडा वेळ टिकतात" आतां ह्या बातमीनें व भाषणानें वास्तविकपणें त्याच्या मनांत कोणते विचारतरंग उठावयास पाहिजे होते बरें ? निकट परिचयामुळें वनमालेच्या सद्गुणांविषयीं जर त्याची

बालंबाल खात्री झालेली असती, तर त्या दोघां पुंडांनीं वनमालेसंबंधी एक वांकडा शब्द बोलतांच त्यानें त्यांना एक अक्षर जास्त बोलूं न देतां हांकून लाविलें असतें. परंतु त्याला संशय आला व त्यांना स्पष्ट काय तें सांगण्याबद्दल त्यानें विनंति केली. त्यांनीं त्याचा संशय वाढावा अशा प्रकारचें स्पष्ट भाषण केलें व तें फाजील पणानें केलें. आतां त्याला त्यांच्या फाजीलपणाचा राग प्रथम यावा कीं त्यांनीं उत्पन्न केलेल्या संशयाचा पिच्छा पुरवून खरें काय तें शोधून काढण्याच्या वेदना त्याला प्रथम व्हाव्यात ? आह्मांस तर असें वाटतें कीं तिच्या वर्तना विषयीं संशय घेणें योग्य कीं अयोग्य याबद्दल त्यानें आपल्या मनाशीं प्रथम विचार करावयास पाहिजे होता, आणि ती निष्पापच आहे असा त्याच्या मनाचा ठाम निर्णय ठरल्या नंतर, मग त्या उभयतां श्रीमंतांनीं भलभलत्या वल्गना केल्याबद्दल त्यांच्या श्रीमंतीला त्यानें लाखोल्या वहावयाच्या होत्या. परंतु (पृ० १०७) धैर्यधर लांबलचक आत्मगत भाषण करून श्रीमंतीवर, लक्ष्मीवर, तिच्या नवऱ्यावर, आणि देवावर सडकून रागावतो ! या ठिकाणचें त्याचें भाषण असंबद्ध, अविचाराचें, बालिश व जवळजवळ बीभत्सच आहे ह्मटलें तरी चालेल "....या पाप्यांच्या कचाट्यांतून मला सोडविण्याचें सामर्थ्य माझ्या नवऱ्याचेंही अंगांत नाहीं, तेव्हां तुह्मी-देवाच्या सत्वशील मुलांनीं–( ह्मणजे धैर्यधर रावसाहेबांनीं ) तरी मात्रागमनाचे पातक करूं

म्हणाऱ्यांच्या हातून आपल्या आईला सोडविलें पाहिजे, असा आक्रोश ही तीन चांदांची लक्ष्मी माझ्या कानीं कपाळीं आतां करूं लागली आहे. राजधानीला पोंचल्याबरोबर महाराजांना विनंति करून प्रथम हेंच करतों--

भूपा विनवुनि मी करीं वेगें ही धनमदनाशसोज्वला मही ॥ धृ० ॥ विपुल सबल फल वाहि कृषिवल, जो धरि महीला निर्मला, निवडे बहु खडे, तो विभव पाही ॥ भूपा ॥ १ ॥"

ह्या ( किंवा इतर कोणत्याही ) पदाचा अन्वयार्थ लावण्याच्या भानगडींत वाचकांनीं पडूं नये. कारण कोणी एखादा गरीब मनुष्य प्रस्तुत नाटकांतील पदांचा उपयोग करावयास मिळावा ह्मणून ज्या वेळीं त्या पदांचें अन्वयार्थासहित पुस्तक छापून प्रसिद्ध करील, त्यावेळींच त्यांना तो कदाचित् समजला तर समजेल ! आपणाला एवढें समजलें ह्मणजे पुरे कीं चौथ्या अंकाच्या शेवटीं धैर्यधरानें मोठा आक्रोश केला आणि राजाकडे ' खडे ' फोडीत जाऊन श्रीमंतांचा निःपात करण्याची त्यानें प्रतिज्ञा केली ! नाटकांतील इतर सर्व वल्गनांप्रमाणें ही धैर्यधराच्या तोंडची वल्गना देखील अंकाची भरती करण्यासाठींच योजिलेली आहे. कारण पांचव्या अंकांत धैर्यधराला आपल्या भीष्मप्रतिज्ञेचें नुसतें स्मरण देखील न होतां नाटक समाप्त झालें आहे !!!

दोष २१ वा—धैर्यधराला लक्ष्मीधराच्या भाषणानें वनमालेबद्दल संशय आला. पण ( पृ० १०७ ) " तिच्याबद्दल संशय घेणेंच म्हणजे मूर्खपणा आहे " असा त्यानें आपल्या मनानें निर्णय ठरविला. एकदां असा निर्णय करून दुसरे विचार त्याच्या मनांत येऊं लागल्यानंतर पुनः विशेष कांहीं कारण न होतां तोच संशय त्याच्या मनांत येणें म्हणजे खुळेपणा नव्हे काय? चौथा अंक संपल्यानंतर पांचव्या अंकास सुरवात होण्यापूर्वी जो पांच चार मिनिटें पडदा पडतो, तेवढ्या अवधींत " तुझ्याबद्दल लक्ष्मीधर असें असें बोलतो, तें खरें काय ! " असें धैर्यधरानें वनमालेला विचारलें असें दिसतें. त्यामुळें वनमाला लक्ष्मीधराच्या नांवानें खडे फोडीत पांचव्या अंकांत प्रवेश करते. त्यावेळीं धैर्यधर पुनः तिला म्हणतो कीं ( पृ० १११ ) असल्या निर्मल डोळ्यांचा, असल्या निष्पाप चेहऱ्याचा, असल्या कोमल मनाचा कोणाला कधीं तरी संशय येईल का ? " असें बोलणारा धैर्यधर वनमालेच्या बापाला विचारून आपल्या संशयाची निवृत्ति करून घेण्यासाठीं त्याची ( पृ० १२२ ) मोठ्या उत्कंठेनें वाट पहातोच ! जणों काय बापानें मुलीच्या चांगल्या चालीबद्दल सर्टीफिकीट दिलें कीं तें असल्या प्रसंगीं पुरे आहे ! बरें ही नाजूक गोष्ट ज्याच्या त्याच्याजवळ खुद्द धैर्यधरानें बडबडणें हें प्रशस्त तरी दिसतें काय ? तो वनमालेच्या बापाची म्हणून वाट पहात असतां भामिनीचे वडील बाबासाहेब

हे आले; परंतु अद्याप त्याला भामिनी हीच वनमाला हें माहीत नसल्यामुळें धैर्यधर बबांसाहेबांस ह्मणतो कीं, वनमालेचे वडील आले असते तर फार चांगलें झालें असतें; ह्मणजे मी त्यांना वनमाला वाईट चालीची आहे कीं काय तें विचारलें असतें! याप्रमाणें वनमालेच्या वाईट चालीसंबंधाची जाहिरात प्रत्येक चव्हाट्यावर चिकटविणारा धैर्यधर " अहो, तें सगळें खोटें, उगीच कुभांड होतें " असें लक्ष्मीधर कबूल करीत असतांही एक विलक्षण दीर्घ शंका काढतो. ( पृ० १२३ ) " तें जर सर्व खोटें, तर वनमालेच्या वडिलांनीं आतां माझें तोंड कां चुकवावें ? येथून पोबारा कां करावा ? " काय ही मौज ! वनमालेच्या ' निराळ्या ' बापाला धैर्यधरानें कधींही पाहिलें नव्हतें; आणि बाबासाहेबच वनमालेचे वडील हें त्याला ठाऊक नव्हतें. तेव्हां तिचा बाप या नात्यानें बाबासाहेबाहून भिन्न असा कोणी पुरुष धैर्यधरासमोर आला नाहीं, ह्मणून वनमालेच्या बापानें ' पोबारा ' केला असें अनुमान धैर्यधर कसें काढतो ? त्याला पोबारा करण्याचें कारण काय असणार ? आपली मुलगी वाईट चालीची असतां ती सद्गुणी आहे असें खोटें कसें बोलूं ह्मणून तो घाबरून पळालीं, असा धैर्यधराचा तर्क कीं काय ? एवढी दीड हात लांब शंका काढून वनमाला वाईट चालीची आहे कीं काय हा आपला संशय तो एकाएकीं शेवटीं विसरला ही तर या नाटकांतील शेवटची अद्भुत गोष्ट होय !

प्रत्यक्ष वनमाला सर्व मंडळीसमोर आल्यावरोबर बाबा साहेबांनीं 'हीच भामिनी' असें ह्मटलें व धैर्य-धरानें नाटक संपण्याची वेळ झाली, ह्मणून आपल्या सर्व शंका विसरून पटकन् तिचें पाणिग्रहण केलें! सोग्याचें नांव गोम्या ठरलें कीं त्याला सगळ्या चोऱ्या, सगळे दरोडे, सगळे खून माफ!! तारा नायकीण पूर्वाश्रमीं गरत होती असा शोध लागतांच तिला पतिव्रतांच्या यादींत गोंवण्यास रा. खाडीलकरांस मुळींच दिक्कत वाटावयाची नाहीं!!!

याप्रमाणें या नाटकांतील किती ह्मणून दोष वर्णावे? येथून तेथवर सगळाच घोंटाळा. कशाला कशाचा मेळ नाहीं! या नाटकांतील पात्रें विचित्र, त्यांचे स्वभाव विचित्र आणि त्यांचे मनोविकारही विचित्र! जें पात्र येतें तें कांहीं तरी बहकतें व आतां बोललेलें घटका-भरानें तें विसरतें! दुसऱ्या अंकांत जी पुष्पमाला वन-मालेची बहीण असते, तीच चौथ्या अंकांत तिची मैत्रीण होते व सबंध नाटकभर तिची दासी होऊन मिरवते! या नाटकांतील एकाही पात्राला मनुष्यस्वभाव नाहीं. स्वर्ग, मृत्यु व पाताळ या तिहीं लोकांतही या नाट-कांतील पात्रांसारखे प्राणी सांपडावयाचे नाहींत. या नाटकासारखें अर्थशून्य, बोधशून्य, व कथाशून्य नाटक या पृथ्वीच्या पाठीवर आजपर्यंत कोणत्याही विद्वानानें खचित लिहिलें नसेल. या नाटकाची एकंदर दशा—छे, दुर्दशा—पाहिली ह्मणजे एकच तर्क संभवतो. तो तर्क

असा कीं अलीकडे रा. खाडीलकरांनीं जाइंट स्टॉक कंपनी उभारून नाटकें तयार करण्याची एखादी गिरणी चालू केली असून त्या गिरणींत तयार झालेलें हें पहिलें नाटक असावें! रा खाडीलकरांच्या नांवावर प्रसिद्ध असलेलीं एक दोन हातमागावरील नाटकें महाराष्ट्र नाटक मंडळीनें केलेलीं आह्मी कित्येक वर्षांपूर्वीं पाहिलीं होतीं व तीं पाहून त्या मंडळीची व रा खाडीलकरांचीही आह्मी बरीच प्रशंसा करीत असूं. पण प्रस्तुत नाटक पाहून व वाचून खाडीलकरांच्या नाटकरचनेच्या कौशल्यासंबंधानें आमचा ग्रह इतका पालटला आहे कीं, प्रस्तुत नाटकाचें सर्व कर्तत्व जर खरोखरीच त्यांचें असेल तर तीं वर ह्मटलेलीं नाटकें तरी त्यांनींच स्वतः लिहिलीं असतील असेंही आमच्यानें खात्रीनें सांगवत नाहीं!

आतां या नाटकांतील पदसंबंधानें जर ह्मटलें तर त्यांत अर्थ सहज समजण्याजोगीं पदें अगदीं थोडीं असून त्यांत स्वारस्य कांहींच दिसत नाहीं. बाकीचीं सर्व पदें समजण्यास इतकी कठिण आहेत कीं त्यांतून अर्थ निष्पन्न करणें ह्मणजे फुकट डोकें झिजवून घेऊन शिवाय कालाचा अपव्यय करणें होय. नाटक हें दृश्य काव्य होय. यांतील प्रत्येक वाक्य पाहतां पाहतां व ऐकतां ऐकतां प्रेक्षकांना समजेसें असलें पाहिजे; इतकेंच नव्हे तर तें समजेशा पद्धतीनेंच पात्रांच्या तोंडांतून निघालें पाहिजे. अलीकडे गायकी

चालींचें ह्मणून जें प्रस्थ सुरू झालें आहे, त्यामुळें गायकी चाल घुसडून देणें येवढीच इतिकर्तव्यता नाटककार मानूं लागले आहेत व गायकी चाल मुखांतून घुसळून काढणें येवढेंच पवित्र कर्तव्य नाटक मंडळ्या समजूं लागल्या आहेत. अर्थाविष्करणाची अवश्यकता त्या उभयतांसही वाटत नाहीं. त्यांतच विशेष दुःखाची गोष्ट ही कीं प्रेक्षकजन देखील अर्थाची अपेक्षा बिलकूल करीत नाहींत परंतु खरें ह्मटलें तर नाटकांतील गद्यात्मक भाषण—संभाषणांनीं जरा कोठें रंग भरूं लागतो तोंच अर्थ न समजणारें गायकी पद्य आडवें येऊन सगळा बेरंग होऊन जातो. अर्थ सहज समजण्या सारख्या शब्दांनीं जर गायकी चालींत पद्यरचना करतां येणें शक्य नसेल, तर पद्यांत अर्थ आणण्याची तरी कवींनीं कां तसदी घ्यावी हें आह्मांस समजत नाहीं. सबंध पद्य कक्काच्या किंवा टट्टाच्या बाराखडींतील अक्षरांनीं वाटेल त्या गायकी चालींत बसवून दिलें ह्मणजे काम झालें! गायकी चाल व उत्तम गाणारा या दोन गोष्टी जुळल्या ह्मणजे मराठी प्रेक्षकगण गद्यांतील घाण व पद्यांतील वाण यांच्या योगानें नाखूष होईल अशी शंका सुद्धां घ्यावयास नको. संगीत मानापमान व श्रीयुत बालगंधर्व यांचा जिवंतपणाच या गोष्टीची साक्ष देण्यास पुरे आहे! सक्तीचें शिक्षण सुरू होईल तेव्हां कोठें नाटककारांना नाटक मंडळ्यांची व नाटक मंडळ्यांना प्रेक्षकांची धास्ती बाळगण्याचा समय येईल

तर न जाणों ! ! तोंपर्यंत गायकी चालींचा वाटेल तसला खडकाळ माल संगीत नाटक मंडळ्यांकडे खपण्याला व प्रेक्षक जनांना पचण्याला जड ज.णार नाहीं ! ! !

प्रस्तुत नाटकांतील पद्यांचा अर्थ सोडविण्याचे श्रम घेण्याची आह्मांस इच्छा किंबहुना शक्ति नसल्यामुळें त्यांतील संगीत भागावर सविस्तर टीका करण्याचें धाडस आमच्यानें करवत नाहीं. तें कर्म दुसऱ्या कोणी तरी उदारधीनें शक्य असल्यास करावें असें येथें नमूद करून ठेवून आतां आह्मीं नाटकांतील गुणांकडे वळतों.

* * * *

या नाटकांत गुण कोणतेही नाहींत. तेव्हां गुणांबद्दल लिहिण्याचा खटाटोप आयताच वांचला !

* * * *

तथापि नाटक या दृष्टीनें नव्हे, पण—पात्राचा स्वभावपरिपोषक नव्हे असा—अतिशयोक्तिरूप वर्णनाचा एक सुंदर व मनोहर मासला या नाट्यानें, पुढील बहारीचा उतारा वाचकांस सादर केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

**लक्ष्मी०**—सेनापतीसाहेबांशीं बोलतांना मुख्य मुद्द्याची गोष्टच बोलायाला मी विसरलें. विलासधरजींनीं मला इतकें पढवलें, पण पालथ्या घागरीवर पाणी ! आतां सगळें आठवलें; भामिनीचा सूड उगविण्याकरितां त्यांना सांगावयाचें होतें, वनमालेसारख्या गरिबांच्या मुली वर्तनानें आपल्या तशाच असतात

तेव्हां तुह्मी सावध रहा. गरिबांच्या बायकासुद्धां शीलानें कुशीलच असावयाच्या, असा आह्मां श्रीमंतांचा सिद्धांत आहे.—कशी माझी दांतखिळी बसली!—हे विलासधर अजून काय त्यांच्याशीं कुजबुजत आहेत! वा! ते दोघे अजून त्या दालनांत बोलत उभे! आपणास बुवा असें तिष्ठत उभें राहण्याचें जिवावर येतें. आह्मी श्रीमंत लोक प्रहरानुप्रहर, दिवसानुदिवस हांथरुणांत लोळत राहूं; खाणें, पिणें, बोलणें सर्व कांहीं लोळत करूं; पण पाय ताठवून दोन पायांच्या खांबावर शरीर उभें करण्याची ही त्रासदायक युक्ति—मजुराप्रमाणें राबणाऱ्या या दरिद्र्यांनीं शोधून काढलेली ही युक्ति—आह्मांला बिलकूल पसंत पडत नाहीं इतक्या वेळ त्यांना उभें राहवतें कसें! परमेश्वराच्या या श्रीमंती सृष्टींत विधात्याचा डोळा चुकवून जर हे दरिद्री शिरले नसते, तर जन्माच्या वेळीं देवानें जसें आह्मांला लोळत झोंपीं गेलेले पाठविलें तसेंच लोळत आह्मी श्रीमंत आमरण राहिलों असतों. या बाजूचें त्या बाजूवर वळावें, केव्हां केव्हां उताण्याचें पालथें व्हावें, फार झालें तर फरफटावें किंवा रांगावें, पण यापलीकडे यातायात आह्मीं श्रीमंतांनीं कां सोसावी?—असें उभें राहण्याचा प्रसंग आला ह्मणजे ही सृष्टि निर्माण करण्यांत श्रीमंतांची सोय देवानें पाहिली नाहीं, हें तेव्हांच ध्यानांत येतें. आमच्या अंगावरील मांस लोण्याच्या गोळ्याप्रमाणें मऊ आहे. हें ठीक आहे; पण

हीं हाडें इतकीं कठीण कशाला? कशीं आंतून टोंचताहेत! देवा, आमचीं हाडें सोललेल्या केळ्यासारखीं केलीं असतीस तर चाललें नसतें का? आंतून हे हाडाचे भाले आणि वरून हे हिऱ्याचे खडे कसे माझ्या अंगांत खुपताहेत! देवा, हिरे फुलासारखे कोमल कां नाहीं केलेस? श्रीमंतांच्या अंगाला चिकटून राहणाऱ्या पातळ तेलाचें रूप, देवा, सोन्याला कां नाहीं दिलेंस? या जाजमाखालची कठीण जमीन चदाबाच्या आंतूनही माझ्या पायांत रुतती आहे! देवा, ही जमीन फत्तरांची न मातीची करावयाला सांगितलें होतें कोणीं?—तारामंडळ निर्माण करण्यांत देवाची सर्व श्रीमंती खर्चून जाऊन ही पृथ्वी निर्माण करितांना देव खरोखर कंगाल झाला असला पाहिजे!. दरिद्री देवाशिवाय झाड, दगड आणि माती पृथ्वीच्या उरावर रचण्याचे एवढे श्रम कोण सोसणार? देवा, मजसारख्या एखाद्या श्रीमंताला जर तूं त्या वेळीं आपला गुरु केला असतास तर दोन दोन, चार चार हात उंचीच्या पिंजलेल्या मऊ रेशमानें व कापसानें ही पृथ्वी फार अल्प श्रमांत झांकतां येते, हें त्यानें नसतें का तुला शिकविलें? देवाच्या या सर्व चुका आमच्या महालांत आह्मी थोड्या थोड्या दुरुस्त करतों; पण या धैर्यधराचे भेटीला आलें ह्मणजे दारिद्र्यासारखेंच वागावें लागतें! घेऊं या आपण लोळण, श्रीमंतांच्या हालचाली कशा असतात हें तरी त्याला शिकूं द्या. ( बसून पाय पस-

रून ) आतां जरा बरें वाटलें.–अजून ते दोघे तेथेंच उभे आहेत.–आतां लागेल तितका वेळ बोलत उभे रहा.

**( अंक ४ था, प्रवेश ३ रा पृ., १०२. )**

याप्रमाणें

(संगीत?)

**(मानापमान?)**

( नाटकाचें? )

आह्मीं यथामति ( गुण ) दोष विवेचन केलें तें कितपत योग्य व न्याय्य आहे, हें योगी व न्यायी वाचक ठरवितीलच. शेवटीं अधिकोत्तराबद्दल रा. खाडीलकर यांची आदरपूर्वक क्षमा मागून त्यांची व वाचकांची आह्मी प्रेमपूर्वक रजा घेतों.

का. क्र. १०४९.

REFBK-0001749

**समाप्त.**